THE BOOK WAS DRENCHED

TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192250
UNIVERSAL LIBRARY

# मर्थांचें बाळबोध चरित्र.

( सचित्र )

लेखक,

कृष्णाजी गोविंद किनरे,

चिमुकलें भारत, भारतांतील गोष्टी
भाग १।२, ध्रुव व चिलया,
मुलांचा श्रीकृष्ण, भांगेंत
तुळस अथवा प्रल्हाद,
वानराचा देव,
इत्यादि मुलांच्या पुस्तकांचे कर्ते.

आवृत्ति पहिली.

सन १९२२.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ).

हें पुस्तक शंकर नरहर जोशी, यांनीं चित्रशाळा छापखान्यांत
( १०२६ सदाशिव पेठ, पुणें ) छापून प्रकाशित केलें.

# समर्थांचें बोळबोध चरित्र.

## थोरांत थोर कोण ?

मुलांनो ! आपल्याला थोरपण यावें, असें सगळ्यांना वाटतें; पण खरें थोरपण म्हणजे काय, हेंच पुष्कळांना समजत नाहीं. आपल्याला पुष्कळ पैसा मिळाला, किंवा आपल्या हातीं कांहीं तरी सत्ता आली, म्हणजे आपल्याला थोरपण आलें, असें पुष्कळांना वाटतें. पण पैशानें किंवा सत्तेनें जें थोरपण येतें, तें खरें थोरपण नव्हे. कारण तें थोरपण कायमचें नसतें. तें आज येतें व ... जातें. शिवाय पैशानें किंवा सत्तेनें जे थोर असतात, ते ...नाच थोर वाटत नाहींत. कांहींना ते थोर वाटत अस... पण कांहींना त्यांची मुळींच किंमत वाटत नाहीं. म्हणजे ...नें किंवा सत्तेनें आलेलें थोरपण हें सर्व काळीं व सर्व स्थळीं ...खें टिकणारें नसतें. जें थोरपण अभंग असतें, तेंच खरें.

जन्मास आलेल्या माणसाला केव्हां तरी मरण हें येणारच. कोणालाही चुकवितां येत नाहीं. पण वर सांगितलेलें अभंग ...रपण ज्यांनीं मिळविलें, तीं माणसें जरी मरून गेलीं, तरी ...ांचें थोरपण मरत नाहीं. त्यांचें नांव मागें राहतेंच. असें ...पलें नांव कायमचें मागें ठेवून जीं माणसें मरतात, त्यांनींच ...पल्या जन्माचें खरें चीज केलें, असें होतें. बाकीच्या माण...ा जन्म फुकट.

**‘ मरावें परी कीर्तिरूपें उरावें ।’**

**व**

**‘कीर्ति करून नाहीं मेले । ते उगेच आले आणि गेले ॥’**

या दोन वचनांत रामदासस्वामींनीं हेंच सांगितलें आहे. आतां हें अभंग थोरपण मिळतें कसें, याचा आपण विचार करूं.

जगांत कांहीं माणसें अशीं असतात कीं, तीं जन्मतात, कांहीं तरी विद्या शिकतात, होईल तो उद्योग करितात, मिळवितां येईल तेवढा पैसा मिळवितात, त्या पैशाच्या बळावर मिळेल तेवढें सुख स्वतः भोगतात, आपल्या कुटुंबांतील माणसांना सुख देतात, व एक दिवस मरून जातात. आपण व आपलें कुटुंब यांच्या सुखापलीकडे त्यांना कांहींच दिसत नाहीं. या वर्गांतलीं माणसें व पशु यांत फारसें अंतर नाहीं. हीं माणसें सगळ्यांत हलक्या प्रतीचीं. तीं जन्मलीं केव्हां व मेलीं केव्हां, याची दाद कोणालाही नसते.

दुसरीं कांहीं माणसें अशीं असतात कीं, तीं आपल्या व आपल्या कुटुंबांतील माणसांच्या सुखाकडे नेहमीं पाहत असतात; पण तें सुख साधून जर दुसऱ्यांच्या थोडेंबहुत उपयोगीं पडतां आलें, तर सवडीप्रमाणें तीं त्यांच्या उपयोगीं पडतात. या वर्गांतलीं माणसें पहिल्या वर्गांतील माणसांपेक्षां कांहीं बरीं.

माणसांचा एक तिसरा वर्ग आहे. या वर्गांतलीं माणसें स्वतःचा संसार करतात. त्यांना कुटुंब असतें. मुलेंबाळें असतात. सगळें कांहीं असतें. पण तीं आपल्या किंवा आपल्या मुलांबाळांच्या हिताकडे किंवा सुखाकडे फारसें लक्ष देत नाहींत. आपल्या देशांतील किंवा समाजांतील माणसांच्या सुखदुःखाकडे ती

नेहमीं पाहत असतात. आपल्या देशाची किंवा समाजाची भरभराट कशी होईल, त्याची कीर्ति कशी होईल, याचाच विचार रात्रंदिवस त्यांच्या मनांत घोळत असतो. आपल्या देशांतील लोकांचीं दुःखें दूर करण्याकरितां तीं सारखीं झटत असतात. देशाच्या हिताकरितां आपलें व आपल्या कुटुंबाचें कितीही नुकसान झालें, किंवा आपल्याला कितीही हाल भोगावे लागले, तरी त्याची तीं परवा करीत नाहींत. सगळ्यांत मनुष्याला आपला जीव हा आवडता असतो. पण देशाच्या हिताकरितां हीं माणसें जिवावरही उदार होतात. देशाच्या उपयोगीं पडतांना जर त्यांना मरण आलें, तर तें मरण त्यांना आनंदाचें वाटतें. अशीं माणसें फारच थोडीं असतात; पण तींच खरीं थोर. व त्यांचेंच नांव मागें अभंग राहतें.

पण या थोरांतही थोर अशीं कांहीं माणसें असतात. त्यांचा स्वतःचा असा संसारच मुळीं नसतो. तीं लग्न करीत नाहींत. स्वतःच्या सुखाकडे मुळींच पाहत नाहींत. जटा वाढवून व लंगोटी लावून तीं जिकडे तिकडे फिरत असतात. पहिल्यानें श्रीरामाची भक्ति करून त्याची पूर्ण कृपा तीं मिळवितात. त्या कृपेच्या बळावर वाटेल ती गोष्ट तडीस नेण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं येतें. अशीं तीं पूर्ण "**समर्थ**" झालीं, म्हणजे मग लोकांचें कल्याण करण्याचें काम तीं हातीं घेतात, व त्यांतच सुख मानितात. सगळ्या लोकांना श्रीरामाच्या भजनीं लावून त्या सगळ्यांचीं मनें तीं एक करितात. अशीं सगळ्यांचीं मनें एक झालीं, म्हणजे त्यांना देशाचें हित तेव्हांच साधतां येतें. या वर्गांतल्या माणसांना स्वतःचा संसार जरी नसतो, तरी सगळ्या देशाचा संसार हाच

आपर गार, असें तीं मानतात; व तो संसार सुखाचा करण्या-करितां तीं सारखीं तळमळत असतात. स्वतः त्यांनीं लंगोटी लाव-लेली असल्यामुळें त्यांना स्वार्थ असा मुळींच नसतो. त्यामुळें लोकांवर त्यांचें वजन तेव्हांच बसतें. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें लोक डोळे मिटून जातात. लोकांचीं मनें अशीं वश झाल्यावर मनुष्याला पाहिजे तसें देशाचें हित साधतां येईल, यांत काय संशय ? या वर्गांतलीं माणसें फारच थोडीं असतात. इतकीं थोडीं असतात कीं, हजारपांचशें वर्षांत असा एखादाच पुरुष कोण-त्याही देशांत जन्मास येतो. अशा पुरुषाला ‘ अवतारी पुरुष ’ असें म्हणतात. वर जो थोर माणसांचा वर्ग सांगितला, त्यांतील माणसें संसारांत पडलेलीं असल्यामुळें त्यांचें थोडें तरी लक्ष आपल्या कुटुंबाकडे असतें. पण हे जे ‘अवतारी पुरुष’ असतात, त्यांना संसार नसतो, घरदार नसतें, मूठभर धान्याचाही सांठा करण्याची त्यांना इच्छा नसते. यामुळें त्यांच्या ध्यानीं, मनीं, स्वप्नीं समाजाचें किंवा देशाचें हितच वागत असतें. श्री-रामाची कृपा त्यांच्यावर असते; पण त्या कृपेचा स्वतः-करितां ते कधींही उपयोग करीत नाहींत. देशांतील लोकांना चांगली बुद्धि दे, त्यांना सुखी कर, अशीच प्रार्थना ते श्री-रामाला करतात. तेव्हां हे अवतारी पुरुष थोरांत थोर किंवा सग-ळ्यांत थोर होत.

असा एखादा अवतारी पुरुष जन्मास आला, म्हणजे त्याच्या हातून देशाचें कसें हित होतें, हें मुलांनो, तुमच्या मनांवर ठसविण्याकरितां या खेपेला ‘ रामदास ’ स्वामींचें चरित्र तुम्हांला सांगावें, असा हेतु आहे. त्यांचें चरित्र पहि-

त्यानें थोडक्यांत सांगून त्यांच्या उपदेशाचें सार तुम्हांला शेवटीं सांगावें, असा बेत आहे. त्यांचें चरित्र व उपदेश यांची माहिती तुम्हांला झाली, म्हणजे आपल्या महाराष्ट्रावर त्यांचे किती उपकार आहेत, श्रीशिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्रांत जें मराठ्यांचें राज्य स्थापलें, त्याला त्यांची किती मदत झाली, हें तुमच्या ध्यानांत येईल. आजही आपल्या देशाची फार वाईट स्थिति झालेली आहे. ही स्थिति घालविण्याला खरा मार्ग कोणता, याचाही बोध त्यांच्या उपदेशावरून होणार आहे. अशा रीतीनें त्यांचें चरित्र व उपदेश यांपासून फार मोठा उपयोग होणार आहे. म्हणून मुलांनो, तुम्ही आतां चांगलें लक्ष ठेवा.

---

## जन्म.

गोदावरी नदीच्या कांठीं जांब म्हणून एक गांव आहे. तेथें सुमारें तीनशें वर्षांपूर्वीं सूर्याजीपंत या नांवाचे एक गृहस्थ होऊन गेले. ते देशस्थ ब्राह्मण असून त्यांचें उपनांव ठोसर असें होतें. ते कुळकर्णी होते. पण ते आपला सगळा काळ देवाची पूजा-अर्चा करण्यांत घालवीत असत. श्रीरामाची भक्ति त्यांच्या घराण्यांत पूर्वींपासून चालत आलेली होती. सूर्याजीपंतांनीं ती तर चालविलीच; पण ते सूर्याचीही फार भक्ति करीत असत. सगळा दिवस श्रीरामाच्या व श्रीसूर्यनारायणाच्या सेवेंत घालवून कुळकर्णीपणाचें काम ते रात्रींच्या वेळीं करीत. त्यांच्या बायकोचें नांव राणूबाई असें होतें. राणूबाईही मोठी साध्वी

होती. श्रीरामाच्या ठिकाणीं तिची भक्ति फार होती. पतीची सेवा करून जो वेळ राही, तो ती श्रीरामाच्या सेवेंत घालवी. अशा रीतीनें हें जोडपें मोठें पुण्यवान होतें.

सूर्याजीपंतांचें वय छत्तीस वर्षांचें झालें, तरी त्यांना मूलबाळ कांहीं झालें नाहीं. यामुळें त्यांचें मन कांहींसें कष्टी असे. पोटीं पुत्र झाला, तर तो मोठा भक्त व्हावा, व त्याची कीर्ति जिकडे तिकडे पसरावी, अशी त्यांची इच्छा होती. सामान्य प्रतीचा पुत्र होण्यापेक्षां तो मुळींच नाहीं, हेंच बरें आहे, असें त्यांना वाटे.

पुढें श्रीसूर्याच्या कृपेनें लवकरच त्यांना एक पुत्र झाला ( शके १५२७ ). त्याचें नांव गंगाधर असें ठेविलें. नंतर तीन वर्षांनीं त्यांना दुसरा मुलगा झाला ( शके १५३० ). त्याचें नांव नारायण असें ठेविलें.

सूर्याजीपंतांच्या इच्छेप्रमाणें हे दोघेही मुलगे उत्तम निघाले. दोघांनींही श्रीरामाची भक्ति करून आपल्या अंगीं थोर योग्यता आणली. दोघांनींही लोकांचें अत्यंत कल्याण करून आपली कीर्ति अमर केली. वडील पुत्र गंगाधर याला सूर्याचा अवतार मानितात. त्याच्या योग्यतेवरून त्याला पुढें ‘ श्रेष्ठ ’ असें नांव मिळालें. ‘ रामींरामदास ’ असेंही त्याचें दुसरें नांव प्रसिद्ध आहे. धाकटा मुलगा नारायण याला श्रीमारुतीचा अवतार मानितात. श्रीरामाची त्यानें विशेष भक्ति केल्यामुळें त्याला पुढें ‘ रामदास ’ असें नांव मिळालें. तरी तो ‘ समर्थ ’ या नांवानें विशेष प्रसिद्ध आहे. आणि त्याच्या योग्यतेचा व त्यानें बजावलेल्या देशाच्या कामागिरीचा विचार करतां ‘ समर्थ ’ हें

नांव त्याला खरोखरच शोभतें. आजपर्यंत हें नांव दुसऱ्या कोणालाही मिळालेलें नाहीं व पुढेंही मिळावयाचें नाहीं.

---

## सावधान ! !

वडील मुलगा गंगाधर याला पांचवें वर्ष लागलें, तेव्हां त्याची सूर्याजीपंतांनीं मुंज केली. व सातव्या वर्षीं त्याचें लग्नही करून टाकलें. नारायणाचीही मुंज पांचवे वर्षीं झाली. ती झाल्यावर दोन वर्षांनीं सूर्याजीपंतांचा अंत झाला. यामुळें तीं दोन्ही मुलें लहानपणींच पोरकीं झालीं.

पुढें नारोबाचेंही एकदां लग्न करून टाकावें, असें राणूबाईच्या मनांत आलें. त्याप्रमाणें तिनें श्रेष्ठांना सांगितलें. तेव्हां श्रेष्ठांनीं तिला उलट असें सांगितलें कीं, या भानगडींत आपण पडूं नये. लग्न करण्याचा घाट घातल्यास नारोबा हातचा जाईल. मग आपणांस भारी दुःख होईल. पण आईचा जीव राहीना. ती मुलींचा तपास करूं लागली. तें समर्थांच्या कानांवर गेलें, तेव्हां ते रुसून एका वडाच्या झाडावर जाऊन बसले. त्यांना तेथून आणण्याकरितां लोक गेले, तेव्हां त्यांनीं खालील ओढ्यांत उडी टाकली. ती बातमी ऐकून श्रेष्ठ धावत आले. त्यांनीं, नारायणा बाहेर ये, असें म्हणतांच ते बाहेर आले. त्यांना पाहून राणूबाईला फार आनंद झाला. त्या वेळीं खडकावर आपटून त्यांच्या कपाळाला एक टेंगूळ आलें; तें अखेरपर्यंत तसेंच होतें.

पुढें राणूबाईनें त्यांना पुष्कळ बोध केला; व माझी आईची आज्ञा तुला ऐकावयाची आहे कीं नाहीं? असा त्यांना तिनें प्रश्न केला. तेव्हां ते म्हणाले, आई, तुझी आज्ञा मी ऐकणार नाहीं, असें कसें होईल बरें? काय तुझें म्हणणें आहे तें सांग; त्याप्रमाणें वागण्यास मी तयार आहें. तेव्हां ती म्हणाली, तुझें लग्न करावें, असें माझ्या मनांत आहे. तूं नाहीं म्हणूं नकोस. माझी तुला शपथ आहे. अंतरपाट धरून 'सावधान' होई-पर्यंत तरी नाहीं म्हणूं नकोस. ती गोष्ट समर्थांनीं कबूल केली.

नंतर राणूबाईनें आपल्याच भावाची मुलगी ठरवून लग्नाचा निश्चय केला. सर्व तयारी झाली. सीमांतपूजन वगैरे सर्व पूर्वींचे विधि उरकले. मुहूर्ताची वेळ आली. तेव्हां अंतरपाट धरून ब्राह्मणांनीं 'सावधान!' असें म्हणून मंगळाष्टकें म्हणण्यास सुरुवात केली. तेव्हां समर्थांनीं ब्राह्मणांस विचारलें कीं, 'सावधान' याचा अर्थ काय? तेव्हां ब्राह्मणांनीं सांगितलें कीं, आतां संसाराची बेडी तुमच्या पायांत पडली, तेव्हां सावध असावें. तें ब्राह्मणांचें वचन ऐकून समर्थांनीं विचार केला कीं, ब्राह्मणांच्या म्हणण्याप्रमाणें आपण सावध व्हावें, हेंच बरें. आईला दिलेल्या वचनांतूनही आपण आतां मोकळे झालों आहों. कारण तिची शपथ येथपर्यंतच होती. तेव्हां आतां गुंतून पडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. असा विचार करून स्वारीनें तेथून चटकन पळ काढला.

इकडे लग्नांत एकच गोंधळ झाला. सगळ्यांनीं त्यांचा पुष्कळ तपास केला, पण कांहीं पत्ता लागेना. राणूबाईनें फारच शोक केला. तेव्हां झाल्या गोष्टीस इलाज नाहीं. कांहीं काळानें

नारोबाची भेट होईल. तोंपर्यंत स्वस्थ चित्तानें असावें. असें श्रेष्ठांनीं तिचें समाधान केलें.

—:—

## पुरश्चरण.

समर्थ लग्नांतून पळाले, ते जांब गांवाहून, गंगेच्या कांठा-कांठानें जाऊन नाशिकाजवळच्या पंचवटीस आले. तेथें श्रीरामाचें दर्शन घेऊन जवळच असलेल्या टांकळी या नांवाच्या गांवीं ते गेले, व एका गुहेंत आपला मुक्काम त्यांनीं ठेवला. तेथें आल्यावर, ‘ श्रीराम जय राम जय जय राम ’ या तेरा अक्षरी मंत्राचें पुरश्चरण ( जप ) करण्याचा त्यांनीं बेत केला. बारा वर्षांत तेरा कोटी जप करावा, असा निश्चय करून पुरश्चरणाला त्यांनीं आरंभ केला. रोज प्रातःकाळीं उठून स्नान-संध्या वगैरे ते करीत; नंतर श्रीगंगेच्या कंबरभर पाण्यांत उभे राहून ते दोनप्रहरपर्यंत जप करीत असत. त्या वेळीं मासे त्यांच्या आंगाला डसत. असे मासे चावून चावून त्यांच्या अंगाचा कंबरेच्या खालचा भाग अगदीं पांढरा होऊन गेला होता. दोन-प्रहरीं पुरश्चरण आटपलें, म्हणजे पंचवटीस जाऊन ते मधुकरी मागत. ती मधुकरी देवळांत आणून श्रीरामाला तिचा नैवेद्य अर्पण करीत. नंतर टांकळीस गुहेंत येऊन ते आपलें भोजन करीत असत. मग संध्याकाळचा सगळा वेळ ते श्रीरामाच्या भजनांत घालवीत. असा त्यांचा नित्यक्रम असे.

समर्थ लग्नांतून पळाले, तेव्हां त्यांचें वय केवळ बारा वर्षांचें होतें. या वयांत सामान्य मुलाला नीट लंगोटीही नेसतां येत

नाहीं. काळोखांत जरा बाहेर जावें लागलें, तर सोबतीवांचून त्याचें पाऊलही पडत नाहीं. अशा वयांत लग्नाची पाळी आलीच, तर त्याला मोठी गंमत वाटते. पण याच वयांत समर्थांनीं काय केलें? ब्राह्मणांनीं 'सावधान' म्हणतांच ते सावध झाले. संसारांत पडून आपल्याला खऱ्या सुखाचा लाभ व्हावयाचा नाहीं, श्रीरामाच्या कृपेचा लाभ करून घेण्यांतच खरें सुख आहे, हें त्यांनीं ओळखलें. घरदार, शेतवाडी यांपैकीं कशाचीही त्यांनीं आशा धरली नाहीं. आई, भाऊ व भावजय यांच्या मायेचा विचार त्यांनीं मनांत आणला नाहीं. पण,

**'देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांच्या तुटी ॥'**

हें आपलेंच वचन त्यांनीं त्या लहान वयांत खरें करून दाखविलें. कशाचीही भीति न बाळगतां ते चालत टांकळीस आले व एका ओसाड गुहेंत राहिले. तेथें राहून कडक तपश्चर्येला त्यांनीं आरंभ केला. या सगळ्या गोष्टींचा विचार केला, म्हणजे मनाला मोठें कौतुक वाटतें. व ते खरोखरीच 'अवतारी पुरुष' होते, अशी मनाची खातरी होते. आपल्याला पुत्र झालाच, तर तो श्रीरामाचा मोठा भक्त असावा, त्यानें आपल्या कीर्तीचा झेंडा त्रिभुवनांत उभारावा, अशी सूर्याजीपंतांची इच्छा होती. ती त्यांची इच्छा श्रीरामानें पुरविली, यांत कांहीं शंका नाहीं. दोन तपेंपर्यंत श्रीराम व श्रीसूर्यनारायण यांची भक्ति सूर्याजी-पंतांनीं केली. ती या दोन उत्तम पुत्रांच्या रूपानें फळास आली, यांत कांहीं संशय नाहीं. **ज्या कुळांत परमेश्वराची भक्ति परंपरेनें अनेक वर्षे चालू असते, त्याच कुळांत असे**

**तेजस्वी व ' समर्थ ' पुरुष उत्पन्न होतात.** इतर कुळांत ते कधींही व्हावयाचे नाहींत. असो.

असा नित्य क्रम चालवून निश्चयाप्रमाणें बारा वर्षांत तेरा कोटी जप त्यांनीं पुरा केला. नंतर पंचवटीस जाऊन श्रीरामाचें दर्शन त्यांनीं घेतलें व ते तीर्थयात्रेला निघाले.

---

## श्रीरामकृपेची थोरवी.

बारा वर्षें कडक तपश्चर्या करून आपल्या भक्तीच्या बळावर श्रीरामाला समर्थांनीं वश करून घेतलें. हा श्रीरामाच्या कृपेचा आधार त्यांनीं पहिल्यानें मिळविला, म्हणूनच त्यांच्या हातून देशाची मोठी कामगिरी झाली. त्यांच्या वाणींत तेज आलें. त्यांच्या वाणींतून निघालेला प्रत्येक शब्द खरा होऊं लागला. कारण, **भक्ताच्या तोंडांतून निघालेला कोणताही शब्द जर खरा झाला नाहीं, तर त्याची लाज श्रीरामालाच असते.** त्यांचा शब्द झेलण्याला हजारों लोक तयार झाले. ऋद्धि व सिद्धि या दोन देवता त्यांच्यापुढें हात जोडून उभ्या राहिल्या. तात्पर्य, समर्थांना पुढें प्रत्येक गोष्टींत जें यश आलें, त्याचें कारण श्रीरामाची कृपा. हा कृपेचा आधार, नसता, तर त्यांच्या हातून कांहीं झालें नसतें. **घराला जसा पायाचा आधार लागतो, तसाच मनुष्याच्या उद्योगाला परमेश्वराच्या कृपेचा आधार लागतो. तो आधार नसेल, तर मनुष्याचा उद्योग कधींही सफळ व्हावयाचा नाहीं. तो आधार**

**असेल तर मनुष्य जें मतांत आणील, तें त्याच्या हातून तडीस जाईल, व कोणत्याही विघ्नाची त्याला बाधा होणार नाहीं.** समर्थांनीं पुढील ओंवीत आपल्या अनुभवानें हेंच सांगितलें आहे:—

**‘ मनीं धरावें ते होतें । विघ्न अवघेंचि नासोन जातें ।**
**कृपा केलिया रघुनाथें । प्रचीत येते ॥ १ ॥**

हें सगळें पुरें ओळखून समर्थांनीं देशाचें हित करण्याचा उद्योग सुरू करण्यापूर्वी श्रीरामाची कृपा मिळविली; व अशा रीतीनें आपल्या पुढील यशाचा पाया अगदीं मजबूत भरला.

आपल्या देशांत हल्लीं देशहिताच्या पुष्कळ चळवळी चाललेल्या आपल्याला दिसतात; पण त्यांना यावें तसें यश आलेलें-मात्र आपल्याला दिसत नाहीं. याचें कारण त्यांना भगवंताच्या कृपेचा आधार नसतो. समर्थांचेंच वचन पहा:—

**सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील त्याचें ॥**
**परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ १ ॥**

कोणत्याही चळवळींत सामर्थ्य येतें व ती यशस्वी होते. पण केव्हां ? भगवंताचें अधिष्ठान (आधार) तिला मिळतें तेव्हां. असें अधिष्ठान जोंपर्यंत नाहीं, तोंपर्यंत कितीही घसाफोड केली, कितीही लेखण्या झिजविल्या, तरी त्या चळवळीला कोणीही भीक घालणार नाहीं. पण आपल्या उद्योगाला भगवंताचें अधिष्ठान देऊन जो कोणी चळवळीला हात घालील, त्याला यश आलेंच पाहिजे. **ज्याला भगवंताची भक्ति नाहीं, तो देशाचा खरा भक्त केव्हांही होणार नाहीं. आधीं भगवंताची भक्ति, मग देशाची भक्ति.** समर्थांनीं हा क्रम धरिला, म्हणून

त्यांना हातीं घेतलेल्या प्रत्येक कामांत यश आलें, व ‘ समर्थ ’ हें नांव त्यांना मिळालें. कारण, खरा समर्थ जो श्रीराम त्याचे सेवकही समर्थच होतात; मग त्या समर्थांच्या समर्थ सेवकांकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाचीही छाती होत नाहीं. असो.

---

## तीर्थयात्रा.

पुरश्चरण पुरें झाल्यावर समर्थांनीं सर्व तीर्थांचें दर्शन घेण्याचा बेत केला. आपल्या देशांत उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत व पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत इतकीं तीर्थें जिकडे तिकडे पसरलेलीं आहेत कीं, त्या सर्वांचें दर्शन घेण्याकरितां जो निघतो, त्याला देशाचा कोपरान-कोपरा फिरावा लागतो. अशा यात्रा केल्यानें पुण्य तर पदरीं पडतेंच; पण नाना देशांची मौज पाहण्यास मिळते. त्यामुळें मनाला नित्य नवा आनंद होतो. नाना प्रकारच्या लोकांशीं प्रवासांत प्रसंग येतात. त्यामुळें त्यांच्या चालीरीति कळतात. निरनिराळ्या लोकांशीं निरनिराळ्या तऱ्हेनें प्रसंगाप्रमाणें वागून आपलें काम कसें साधून घ्यावें, याचें ज्ञान होतें. दया, क्षमा, शांति वगैरे उत्तम गुण आपोआप अंगीं बाणतात. प्रकृति उत्तम सुधारून शरीर तेजस्वी बनतें. आपल्या देशांतील लोकांची खरी स्थिति काय आहे, हें प्रत्यक्ष पाहण्यास सांपडतें. असे यात्रेपासून अनेक फायदे होतात; आणि ज्या वेळीं आजच्याप्रमाणें प्रवासाचीं साधनें नव्हतीं व त्यामुळें सर्व यात्रा ज्या वेळीं पायींच कराव्या लागत, त्या वेळीं तर हे फायदे विशेषच होत असत. असो.

निरनिराळीं तीर्थें हिंडण्यांत समर्थांनीं बारा वर्षें घालविलीं. त्यांनीं एकही तीर्थ सोडलें नाहीं. जेथें मनुष्याला जाणें फारच कठिण पडतें, अशीं हिमालयांतील बिकट ठिकाणचीं तीर्थेंही त्यांनीं ठेवलीं नाहींत. निरानिराळीं तीर्थें हिंडतांना समर्थांची योग्यता पाहून त्यांना अनेक शिष्य मिळाले. त्यांत जे योग्य दिसले, त्यांच्यावर कृपा करून त्यांना त्यांनीं उपदेश दिला. व ज्या ज्या ठिकाणीं असे योग्य शिष्य मिळाले, त्या त्या ठिकाणीं मठ स्थापून व त्या मठांवर एका चांगल्या शिष्याची नेमणूक करून लोकांत धर्माचा प्रसार करण्याचें काम त्याच्याकडे सोंपवून दिलें. अशा रीतीनें तीर्थें हिंडतां हिंडतांच लोकांना चांगल्या मार्गाला लावण्याच्या आपल्या कामगिरीला समर्थांनीं आरंभ केला. सर्व यात्रा संपवून बारा वर्षांनीं ते पंचवटीस परत आले.

---

## मनाची तळमळ.

बारा वर्षें यात्रेच्या निमित्तानें समर्थांना सर्व देशभर फिरावे लागलें. फिरतां फिरतां देशाची एकंदर स्थिति काय झाली आहे हें त्यांना स्वतःच्या डोळ्यांनीं पाहतां आलें. तेव्हां त्यांना काय दिसलें ? जिकडे तिकडे मुसलमानांचा जुलूम चाललेला आहे धर्माचा पुरा लोप झालेला आहे. अनेक देवस्थानें त्यांनीं भ्रष्ट करून टाकलीं आहेत. बायकांची अब्रू सुरक्षित नाहीं. गोमातेल कोणी त्राता उरलेला नाहीं; तिचा वध राजरोस होत आहे

ब्राह्मणांचा कोणी वाली नसल्यामुळें त्यांचा अतोनात छळ होत आहे. मुसलमानांच्या जुलमामुळें सगळे लोक गाईप्रमाणें दीन झालेले आहेत. त्यांच्या ठिकाणीं स्वाभिमान मुळींच राहिलेला नाहीं. कोणाच्या अंगांत तेज नाहीं, पाणी नाहीं. क्षत्रियांत क्षत्रियपणा राहिलेला नाहीं. ब्राह्मणांत ब्राह्मणत्व नाहीं. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. शूद्र ब्राह्मणांचा तिरस्कार करूं लागले आहेत. ब्राह्मणांचे आचार बुडवून टाकण्यांत त्यांना मोठा पुरुषार्थ वाटूं लागला आहे. ब्राह्मण हे वास्तविक सगळ्यांचे गुरु. पण त्या ब्राह्मणांच्या ठिकाणीं खोटा अभिमानमात्र शिल्लक राहिला आहे. बाकी त्यांची सगळी शेंडी परक्यांच्या हातांत गेलेली आहे. सर्व समाजाची अशी हीन स्थिति झाल्यामुळें जिकडेतिकडे मत्सर बोकाळला आहे. मला नाहीं, तुला नाहीं, घाल कुत्र्याला, असा लोकांचा स्वभाव बनत चालला आहे. तिऱ्हाइतानें खाल्लें तरी चालेल, पण तुला पचूं देणार नाहीं, असा घातकी दुष्टपणा समाजांत नांदूं लागला आहे. अधिकाऱ्यांपुढें लाळ घोटून, स्वार्थ साधून घेण्यांतच पुष्कळ लोकांना मोठेपणा वाटूं लागलेला आहे. सगळ्या देशाची अशी हीनदीन अवस्था झालेली पाहून समर्थांचें मन तळमळूं लागलें, व ही स्थिति पालटण्याला काय करावें, याचा ते विचार करूं लागले. रात्रंदिवस तोच विचार त्यांच्या मनाला पीडा देऊं लागला.

**उदास वाटे जीवीं । आतां जावें कुणीकडे ॥**
**तूं भक्तवत्सला रामा । बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥**

अशी त्या तळमळीच्या भरांत ते श्रीरामाची सारखी प्रार्थना

करीत. यात्रा संपवून ते पंचवटीला आले, तेव्हां त्यांचें मन देशाच्या विचारानें अशा रीतीनें अस्वस्थ झालेलें होतें.

## आईची भेट

समर्थ जांबेहून पळून गेल्यापासून त्यांच्या आईचा शोक अगदीं अनावर झाला. ‘ माझा नारायण पुन्हा माझ्या कधीं दृष्टीस पडेल ? ’ असा ध्यास तिला लागून राहिला. शोक करितां करितां शेवटीं तिची दृष्टिही गेली. श्रेष्ठ तिचें समाधान करितां करितां थकले. पण तिचें दुःख कमी होईना. समर्थ पंचवटीहून गंगेची प्रदक्षिणा करण्याकरितां निघाले, ते पैठणास आले. तेथें त्यांना जांबेचा एक ब्राह्मण भेटला. त्यानें घराकडील ही हकीकत त्यांना सांगितली. ती ऐकून समर्थ तसेच जांबेस गेले. त्यांनीं आईच्या चरणीं साष्टांग नमस्कार घातला. तिनेंही त्यांना आलिंगन दिलें व त्यांच्या तोंडावरून प्रेमानें हात फिरवीत म्हटलें, ‘नारोबा, तूं बराच थोर झालास रे ! पण आतां मी तुला कोणत्या दृष्टीनें पाहूं ? ’ हे मातेचे प्रेमाचे शब्द ऐकतांच समर्थ म्हणाले, ‘ आई ! दृष्टीला काय उशीर ? ’ असें म्हणून त्यांनीं तिच्या डोळ्यांवरून हात फिरविला. त्याबरोबर तिची दृष्टि आली. तेव्हां तिनें समर्थांची मूर्ति डोळे भरून पाहिली. त्यांना पाहून तिला जो आनंद झाला, तो कोठवर वर्णावा !

श्रेष्ठ घरांत संध्या करीत होते. इतक्यांत त्यांना नारोबा आल्याची बातमी कळली. ते लागलेच बाहेर आले. समर्थांनीं त्यांना साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां श्रेष्ठांनीं उचलून त्यांना

पोटाशीं धरलें. त्या वेळीं उभयतांना अत्यानंद झाला. नंतर सर्वांचीं आनंदानें भोजनें झालीं. तीं झाल्यावर, तुम्हीं गेल्यापासून आजपर्यंत काय काय केलें ? असा प्रश्न श्रेष्ठांनीं केला. तेव्हां समर्थांनीं घरून निघाल्यापासून परत येईपर्यंतची आपली सगळी हकीकत त्यांना सांगितली. ती ऐकून मातोश्रीला व श्रेष्ठांना फार आनंद झाला. आपल्या कुळाचा यानें खरा उद्धार केला, असें दोघांनाही वाटलें. आईच्या इच्छेवरून समर्थ कांहीं दिवस घरीं राहिले. त्या मुदतींत स्नान, संध्या, भोजन वगैरे आटपल्यावर त्या दोघां भावांचीं धर्माच्या विषयावर संभाषणें होत. श्रेष्ठ जरी प्रपंचांत होते, तरी त्यांची योग्यता थोर होती. 'श्रेष्ठ' हें नांव त्यांना खरोखरच शोभत होतें. ते मोठे भक्त होते. भक्तीवर त्यांनीं एक उत्तम ग्रंथ रचलेला आहे; शिवाय त्यांची कविताही पुष्कळ आहे. असो. उभयतां पुत्रांचे रोज होणारे संवाद ऐकून मातोश्रीला फार समाधान वाटे.

असे कांहीं दिवस आनंदांत घालविल्यावर मातोश्रीची व श्रेष्ठांची आज्ञा घेऊन समर्थ गंगेची प्रदक्षिणा करण्याकरितां पुढें निघाले. त्या वेळीं मातेनें पुन्हा बहुत शोक केला. तेव्हां समर्थांनीं धर्माच्या व समजुतीच्या गोष्टी सांगून तिचें समाधान केलें. मग तिनें त्यांना मोठ्या संतोषानें निरोप दिला.

---

## साधूंचा मेळा.

गंगेची प्रदक्षिणा करून समर्थ सातारा जिल्ह्यांत कृष्णेच्या कांठीं चांफळखोऱ्यांत येऊन राहिले ( शके १५६६ ). त्यांची

बहुतेक कामगिरी त्यांनीं याच खोऱ्यांत राहून केली. येथें आल्यावर त्यांनीं आपला मुक्काम पहिल्यानें एका ठिकाणीं असा ठेवलाच नाहीं. कधीं माहुलीस, कधीं कऱ्हाडास, कधीं शहापुरास, असे निरनिराळ्या ठिकाणीं ते आलटूनपालटून रहात असत. कुठेही असले, तरी त्यांची वसति कधींही गांवांत नसे. कोणत्या तरी डोंगरावर, किंवा कोणत्या तरी घळींत ते रहात असत. आसपासच्या गांवांत फिरून पोटापुरती भिक्षा मागावी, जें कोणी कांहीं देईल, तें संतोषानें घ्यावें, भिक्षेच्या निमित्तानें फिरतांना सगळ्या लोकांची स्थिति बारकाईनें पहावी, योग्य माणसें भेटतील, त्यांच्यावर कृपा करून त्यांना उपदेश द्यावा, ठिकठिकाणीं मारुतीच्या मूर्तीची स्थापना करावी, व अशा रीतीनें लोकांचें लक्ष धर्माकडे लावावें, असा क्रम त्यांनीं सुरू केला.

समर्थांच्या वेळेला अनेक सत्पुरुष महाराष्ट्रांत अवतरले होते. श्रीतुकाराममहाराज देहूकर, जयरामस्वामी वडगांवकर, आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर, रंगनाथस्वामी निगडीकर, केशवस्वामी भागानगरकर, मोरयादेव चिंचवडकर, रघुनाथस्वामी भालगांवकर, हे त्यांत मुख्य होते. या वेळीं महाराष्ट्रांत साधूंचा एक मोठा मेळाच जमला होता, असें म्हटलें तरी चालेल. मुसलमानांच्या जुलमामुळें जो धर्माचा लोप झाला होता, तो नाहींसा करून लोकांमध्यें धर्माचा प्रसार करण्याचें काम या साधूंच्या मेळ्यानें फारच उत्तम प्रकारें बजावलें. तेणेंकरून लोकांत एकी पुष्कळ झाली, व आपल्या स्थितीची जाणीव त्यांना उत्पन्न झाली. पुढें शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्रांत जें मराठ्यांचें राज्य स्थापलें, त्याला या सर्व साधु पुरुषांनीं लोकांत जी धर्माची चळवळ केली,

तिचा फार उपयोग झाला. जमिनीची उत्तम मशागत झाली, म्हणजे तींत टाकलेलें बीं तेव्हांच रुजून फोफावतें. त्याचप्रमाणें लोकांचीं मनें या साधु पुरुषांनीं भक्तीच्या मार्गाला लावून स्वराज्याला अनुकूळ करून ठेविलीं. त्यामुळें शिवाजीमहाराजांचें काम किती तरी सोपें झालें.

समर्थ चांफळखोऱ्यांत आल्यावर वर सांगितलेल्या सर्व साधूंच्या कानांवर त्यांची कीर्ति गेली. तेव्हां त्यांनीं मुद्दाम येऊन समर्थांची भेट घेतली. समर्थांनींही त्यांना उलट भेटी दिल्या. अशा रीतीनें एकमेकांचा परिचय एकमेकांना होऊन सगळ्यांची योग्यता परस्परांना कळून आली. त्यामुळें परस्परांत अत्यंत प्रेम उत्पन्न झालें. समर्थांबद्दल तर सर्वांना विशेष आदर वाटे. व सगळे त्यांना वडिलांप्रमाणें मानीत.

---

## तळमळीची शांति.

लोकांची दीनावस्था कशी सुधारावी, ही तळमळ समर्थांना यात्रेहून आल्यानंतर सारखी लागली होती, असें मागें सांगितलें आहेच. चांफळखोऱ्यांत आल्यानंतर ही त्यांची तळमळ विशेषच वाढली. म्हणून ते विचार करीत वेड्यासारखे रानेंवनें भटकूं लागले. ते वेडेच आहेत, असें पहिल्यानें लोकांना वाटे; पण त्यांना केवळ लोकहिताचेंच वेड लागलें होतें. पुढें त्यांची योग्यता लोकांना कळून आली.

शेवटीं त्यांच्या मनानें असें घेतलें कीं, सगळ्या लोकांना जर श्रीरामाच्या भजनीं लावलें, तर तो राम मुसलमानांच्या जांचां-

तून लोकांची सुटका केल्यावांचून कदापि राहणार नाहीं. ज्या रामानें तेहतीस कोटी देवांना रावणाच्या कैदेतून सोडविलें, त्या रामाला जर भक्तीनें प्रसन्न केलें, तर तो धावत येऊन लोकांना मुसलमानांच्या छळांतून सोडविणार नाहीं का ?

**करी दुर्जनांचा संहार । भक्तजनासी आधार ।**
**ऐसा हा तो चमत्कार । रोकडा चाले ॥ १ ॥**

असा रोकडा चमत्कार करणाऱ्या श्रीरामाला जर या वेळीं लोकांनीं भक्तीनें आळंविलें, तर तो चटकन त्यांचीं दुःखें दूर करून त्यांना सुखी करणार नाहीं का ? ' रामा धांव ' अशी एकच हाक सगळ्या गांजलेल्या लोकांनीं जर शुद्ध भावानें मारली, तर तो राम उड्या घालीत आल्यावांचून राहील का ? सगळ्या त्रिभुवनाला भारी झालेल्या रावणाला केवळ वानरांच्या मदतीनें ज्या रामानें मारिलें, तो राम या दीन झालेल्या लोकांच्या शत्रूची खोड मोडण्याला असमर्थ आहे का ? असे विचार त्यांचा मनांत आले. व सगळ्या लोकांचीं मनें श्रीरामाच्या पायीं लागण्याला काय युक्ति योजावी, हा प्रश्न त्यांच्या मनांत सारखा घोळूं लागला. एकान्तांत हिंडतांना, प्रत्येक पाऊल टाकतांना, आकाशाकडे पाहतांना, बसतांना, उठतांना, खातांना, पितांना, या प्रश्नावांचून त्यांना दुसरें कांहीं सुचत नव्हतें. विचार करितां करितां त्यांनीं असें ठरविलें कीं, श्रीरामाचा उत्सव मोठ्या प्रमाणावर सुरू करावा. त्याचप्रमाणें हनुमंतजयंतीचेही उत्सव जिकडे तिकडे सुरू करावे. म्हणजे लोकांना भक्तीचें वळण आपोआप लागेल. व तें लागलें कीं, श्रीराम त्यांचें

दुःख आपोआप दूर करील. असा मनाचा निश्चय झाल्यावर त्यांची तळमळ शांत झाली.

---

## उत्सवाला सुरवात.

समर्थांचा शिष्यवर्ग या वेळीं बराच वाढला होता. म्हणून चांफळखोऱ्यांत निरनिराळ्या ठिकाणीं मठांची स्थापना करून प्रत्येक मठावर योग्य शिष्याची नेमणूक त्यांनीं केली. जागजागीं मारुतीच्या मूर्तींची स्थापना करून मारुतीच्या जन्माचा उत्सव त्या त्या ठिकाणीं होईल, अशी व्यवस्था झाली. श्रीरामाचीं देवळें जागोजाग बांधवून रामजयंतीचे उत्सव त्या त्या ठिकाणीं थाटानें होतील, अशी तजवीज केली. मठांवर जे शिष्य नेमलेले असत, त्यांनीं आसपासच्या गांवांत हिंडून लोकांचीं मनें धर्माकडे व श्रीरामाच्या भजनाकडे लावावीं, अशी शिस्त समर्थांनीं घालून दिली होती. शिष्यांनीं भिक्षेवर आपला निर्वाह करावा, पण भिक्षा फक्त पोटापुरती मागावी, धान्याचा किंवा पैशाचा संग्रह मुळींच करूं नये, असा नियम घातलेला होता.

चांफळमुक्कामीं शिष्यांच्या मदतीनें श्रीरामाचें मोठें देऊळ बांधून तेथें मूर्तीची स्थापना समर्थांनीं केली, व त्या देवळांत रामजयंतीचा उत्सव मोठ्या थाटानें होऊं लागला. चांफळास उत्सव सुरू होण्यापूर्वीं तीनचार उत्सव त्यांनीं मसूर या नांवाच्या गांवीं केले होते.

चांफळास श्रीरामाच्या देवळाजवळच समर्थांनीं एक मठ बांधला. व आपली शिष्यमंडळी त्या ठिकाणीं ठेविली. सम-

र्थांचे शिष्य या वेळपर्यंत किती तरी झाले होते. पैकीं उद्धव गोसांवी, भानजी गोसांवी, भिकाजी गोसांवी, कल्याणस्वामी, आकाबाई व वेणूबाई यांच्यावर समर्थांची विशेष कृपा असे. व ही मंडळी नेहमीं त्यांच्याजवळ असे. हा मठ जरी समर्थांनीं बांधला होता, व आपली आवडती शिष्यमंडळी जरी तेथें ठेविली होती, तरी त्यांचा स्वतःचा मुक्काम कुठे तरी रानावनांत, डोंगरांत, एखाद्या खोऱ्यांत, किंवा घळींत असे. चांफळखोऱ्यांत चंद्रगिरीच्या डोंगरांत त्यांची एक आवडती घळ होती. तिचें नांव 'रामघळ'. या घळींत त्यांचा मुक्काम बराच असे.

श्रीरामाचे उत्सव समर्थांनीं सुरू केले, हें खरें. पण उत्सवाच्या वेळीं ते तेथें केव्हांही स्वतां हजर रहात नसत. कारण आपण हा उत्सव करितों, असा लौकिक त्यांना मुळींच नको होता. लोकांना श्रीरामाच्या भजनीं लावणें हा उत्सवाचा मुख्य हेतु. तो साधावा, यांतच त्यांना आनंद होता.

**दास डोंगरीं राहातो । यात्रा देवाची पाहातो ।**

असें त्यांनीं स्वतःच म्हटलें आहे. असो.

# दोन प्रवाहांचा संगम.

अशा रीतीनें लोकांना भक्तीच्या मार्गाला लावून श्रीरामाची कृपा त्यांच्यावर होईल, असा उद्योग समर्थांनीं जोरानें सुरू केला. पण कोणत्याही कामांत यश येण्याला नुसती श्रीरामाची कृपा उपयोगीं पडत नाहीं. **श्रीरामाच्या कृपेचा आधार मिळवून मनुष्यानें उद्योग केला, म्हणजे श्रीराम तो उद्योग सफळ करितो. आळशी मनुष्याला परमेश्वर कधींही मदत करीत नाहीं.** परमेश्वर काय

करील तें खरें, असें नुसतें म्हणून स्वस्थ बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण कष्ट केल्यावांचून परमेश्वर, आपणांस जें पाहिजे तें कधींही देणार नाहीं.

**आधीं कष्ट मग फळ । कष्टचि नाहीं तें निर्फळ ।**

किंवा,

**लहानथोर काम कांहीं । केल्यावेगळें होत नाहीं ।**

हीं समर्थांचीं वचनें हेंच सांगतात. **मनुष्याचे कष्ट व परमेश्वराची कृपा अशी जोडी जेथें मिळते, तेथेंच यश येतें.** या जोडीपैकीं परमेश्वराची कृपा लोकांना मिळेल, अशी खटपट समर्थांनीं चालविली होती. दुसरें काम उद्योग करण्याचें. तें काम श्रीशिवाजीमहाराजांनीं उचललें होतें. मिळून हे दोघे थोर पुरुष देशाला मुसलमानांच्या जांचांतून सोडवून तेथें स्वराज्य स्थापण्याची खटपट करीत होते. पण हा वेळपर्यंत दोघांचे उद्योग निरनिराळे चालले होत. यांची दाद त्यांना नव्हती, व त्यांची दाद यांना नव्हती. दोन नद्यांचे प्रवाह निरानिराळे वाहत असावे, त्याप्रमाणें या दोन पुरुषांच्या चळवळी निरनिराळ्या चालल्या होत्या. पण दोन प्रवाहांचा संगम झाला, म्हणजे ज्याप्रमाणें त्याजोडप्रवाहाला फार जोर येतो, त्याप्रमाणें या दोन चळवळींच्या प्रवाहांना खरा जोर येण्याला त्यांचा संगम होणें जरूर होतें. तो संगम लौकरच घडून आला. तिकडेच आपण आतां वळूं.

शिवाजीमहाराजांनीं शूर मावळ्यांच्या मदतीनें कोंकणांत व मावळांत आपला अंमल या वेळीं बसाविला होता. ज्या चांफळखोऱ्यांत समर्थांनीं आपला उद्योग चालविला होता, त्या चांफळखोऱ्यांत महाराजांचाच अंमल होता. समर्थांची कीर्तिही महा-

राजांच्या कानांवर गेलेली होती. पण अद्यापपर्यंत या दोघां थोर पुरुषांची प्रत्यक्ष भेट झालेली नव्हती.

महाराजांची आपल्या धर्मावर मोठी श्रद्धा होती. मुसलमानांच्या अंमलांत धर्माचा छळ होत असलेला पाहून त्यांचें अंतः-करण कळवळलें. तो जुलमी अंमल नाहींसा करून स्वराज्याची स्थापना केल्यावांचून धर्म, गाई व ब्राह्मण यांचें व्हावें तसें रक्षण व्हावयाचें नाहीं, अशी त्यांच्या मनाची खातरी झाल्यामुळें स्वराज्य स्थापण्याच्या उद्योगाला ते लागले होते, व त्यांच्या त्या उद्योगाला हळुहळू यशही येत होतें.

महाराष्ट्रांत त्या वेळीं अनेक साधु पुरुष उत्पन्न झाले होते, हें मागें सांगितलेंच आहे. अशा साधु पुरुषांच्या भेटी वारंवार घ्याव्या, त्यांची सेवा करावी, त्यांच्या संगतीला राहावें, त्यांचे आशीर्वाद घ्यावे, असा महाराजांचा क्रम असे. पण समर्थांच्या दर्शनाचा लाभ त्यांना अद्याप झाला नव्हता. त्यामुळे पुढें त्यांना असें वाटलें कीं, समर्थ आपल्या प्रांतीं असून आपण त्यांचें दर्शन इतक्या दिवसांत घेतलें नाहीं, त्यांची कांहीं विचारपूस केली नाहीं, ही आपली मोठी चूक झाली. या चुकीबद्दल त्यांचें मन त्यांना खाऊं लागलें. त्यामुळें कधीं एकदां त्यांचें दर्शन घडेल, अशी तळमळ त्यांच्या मनाला लागली.

तेव्हां, समर्थांचे पायांचें दर्शन घेतल्यावांचून आतां अन्नाला शिवावयाचें नाहीं, असा मनाचा निश्चय करून बाळाजी आवजी चिटणीस, निळो सोनदेव मुझुमदार वगैरे कांहीं निवडक माणसें बरोबर घेऊन एक दिवस महाराजांची स्वारी निघाली. चांफळास आल्यावर समर्थ सिंगणवाडीस आहेत, असें त्यांना कळलें. तेथें महा-

राज गेले. तों एका उंबराच्या झाडाखालीं समर्थ बसलेले त्यांना दिसले. तेव्हां त्यांनीं त्यांच्या पायांवर लोटांगण घातलें ( शके १५८१ ). समर्थांनीं त्यांना प्रेमानें उठवून म्हटलें, ' शिवबा ! तुमच्या देशांत आम्ही इतकीं वर्षें आहों. आमचा समाचार बराच चांगला घेतला! ' असें म्हणून समर्थ हासले. तेव्हां महाराज मोठ्या नम्रपणानें म्हणाले, ' मी अपराधी आहें. समर्थांनीं क्षमा करून मजवर कृपा करावी. ' यावर समर्थांनीं त्यांना तेरा अक्षरी मंत्राचा उपदेश दिला व धर्माचाही पुष्कळ बोध केला. शेवटीं एक नारळ, मूठभर माती, दोन मुठी लीद व चार मुठी खडे हीं महाराजांच्या पदरांत टाकलीं. त्या वेळीं महाराजांनीं पुन्हा साष्टांग नमस्कार घातला व ते हात जोडून उभे राहिले, आणि म्हणाले, 'आतां राज्याच्या भानगडींत मला पडायाचें नाहीं. झालें तेवढें पुरे. आतां आपल्या पायांपाशीं नित्य राहून सेवा करावी, एवढीच इच्छा आहे. तेवढी आपण पुरवावी.' हें ऐकून समर्थ हासून म्हणाले, 'वा ! ठीक ! याकरितांच माझे पायांशीं आलास वाटतें ? शिवबा ! तुझा धर्म तूं चालवावा, हेंच योग्य. तूं क्षत्रिय. राज्य स्थापणें, त्याचें रक्षण करणें, तें वाढविणें, प्रजेचें उत्तम रीतीनें पालन करून तिला सुखी करणें, देव, गाई, ब्राह्मण, यांची सेवा करणें, हा तुझा धर्म. तो धर्म तूं उत्तम चालविलास कीं, तुझा जन्म सफळ होईल. तुझ्या हातून अद्याप पुष्कळ काम व्हावयाचें आहे. देशांत माजलेलें मुसलमानांचें बंड तुझ्या हातून मोडवावें, अशी श्रीरामचंद्र प्रभूची इच्छा आहे. ' समर्थांचें हें भाषण ऐकून महाराज म्हणाले, ' आपली आज्ञा मला मान्य आहे. त्या आज्ञेबाहेर मला जावयाचें नाहीं.' मग समर्थांनीं त्यांना राजाचा

व क्षत्रियाचा खरा धर्म काय, हें स्पष्ट करून सांगितलें. तेव्हां महाराजांना फार मोठा आनंद झाला.

मग सगळी मंडळी चांफळास आली. तिथे महाराजांचा तीन-चार दिवस मुक्काम झाला. त्या मुदतींत राज्यस्थापनेला आरंभ केल्यापासून आपली सगळी हकीगत महाराजांनीं समर्थांना सांगितली. ती ऐकून समर्थांना किती तरी संतोष वाटला. मग समर्थांनीं महाराजांबरोबर जी कारभारी मंडळी होती, तिला सेवकाचा धर्म काय, सेवकानें वागावें कसें, याचा फारच छानदार उपदेश केला. तो ऐकून महाराजांच्या सर्व सेवकांना मोठा आनंद झाला, व त्यांनीं त्या उपदेशाप्रमाणें वागून महाराजांची सेवा इमानानें करण्याचें कबूल केलें.

इतकें झाल्यावर चवथे दिवशीं समर्थांचा निरोप घेऊन महाराज परत फिरले, ते प्रतापगडास आले. मातोश्री जिजाबाई-साहेब, आपल्या तीन राण्या, व इतर सर्व मंडळी, यांना समर्थांचा प्रसाद महाराजांनीं दिला. तेव्हां मातोश्रींनीं विचारलें, 'शिवबा! नारळ, माती, लीद व खडे, असा प्रसाद समर्थांनीं दिला, त्याचा अर्थ काय बरें? तेव्हां महाराज हासून म्हणाले, 'आईसाहेब! नारळ हा केवळ माझे कल्याणार्थ प्रसाद म्हणून दिला आहे. पण माती दिली, यावरून मला पृथ्वी मिळेल, माझ्या राज्याचा विस्तार होईल, असें सुचविलें. माझ्या ताब्यांत पुष्कळ किल्ले राहतील, असें खड्यांनीं सुचविलें. घोड्यांच्या पुष्कळ पागा माझे पदरीं राहतील, असें लीद देऊन सुचविलें.' हें ऐकून मातोश्रींस फार संतोष झाला.

—:—

# श्रीभवानीची आज्ञा.

दर गुरुवारीं समर्थांचें दर्शन घेऊन आठ दिवसांत घडलेली हकीगत त्यांना सांगावी, व पुढील आठवड्यांत जें काय करावयाचें असेल, त्याबद्दल त्यांची आज्ञा घेऊन ठेवावी, असा क्रम महाराजांनीं चालविला. एकदां एकाएकीं मुसलमानांची स्वारी आली. समर्थांच्या मसलतीवांचून कांहीं करावयाचें नाहीं, असा महाराजांचा नियम होता. समर्थांचा तर कोठेंच तपास लागेना. कारभाऱ्यांनीं मग विनंती केली कीं, 'महाराज ! हा आपला नेम कसा चालेल बरें ? तेव्हां आलेला प्रसंग सर्वांच्या विचारानें पार पाडावा.' पण महाराज आपला हेका सोडीनात. इतक्यांत समर्थ तेथें आले. तेव्हां सर्वांना आनंद झाला. समर्थही म्हणाले, 'शिवबा ! राज्यांत कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल, याचा नेम नाहीं. आम्ही कुठे तरी भटकत असणार. तुझा नेम तर असा. हा चालणार कसा बाबा ? याकरितां वेळ येईल ती सर्वांच्या विचारानें काढीत असावें.' यावर महाराजांनीं उत्तर केलें, ' काय वाटेल तें होवो ! राज्याची ती किंमत काय ? आपल्या आज्ञेवांचून पाऊलही टाकावयाचें नाहीं. '

हें भाषण ऐकून समर्थांनीं महाराजांना पोटाशीं धरून म्हटलें, " शिवबा ! धन्य आहेस तूं ! असो. आतां आम्ही सांगतों त्याप्रमाणें करावें. ज्या वेळीं असा कांहीं विशेष प्रसंग येईल, त्या वेळीं श्रीभवानीच्या आज्ञेप्रमाणें वागावें. एक प्रश्न करणारा, व एक लिहिणारा असे दोन विश्वासू गृहस्थ घेऊन तूं एकान्तीं बस. जो काय प्रश्न विचारावयाचा असेल, तो प्रश्न करणारानें

विचारावा. म्हणजे तुझ्या अंगांत देवी येऊन ती तुझ्या मुखानें त्याचें उत्तर देईल. तें लेखकानें कागदावर लिहून घ्यावें. मग तो लेख पाहून जशी देवीची आज्ञा झाली असेल, तीप्रमाणें तूं वाग." असें सांगून समर्थ गेले. महाराजांनीं मग शत्रूवर चाल करून त्याची स्वारी मागें परतविली. पुढें त्यांनीं कारण पडेल तेव्हां देवीची आज्ञा घेऊन तीप्रमाणें वागण्याचा क्रम ठेविला.

---

## कुबडीतीर्थ.

एकदां समर्थांच्या दर्शनाकरितां महाराज चांफळखोऱ्यांत गेले. तेव्हां समर्थांचा मुक्काम निंबघळींत होता. तेथें गेल्यावर नेहमींच्या पद्धतीप्रमाणें महाराजांनीं समर्थांच्या पायांवर डोकें ठेवलें व ते हात जोडून उभे राहिले. तेव्हां समर्थांनीं त्यांना आपलेजवळ बसवून घेऊन म्हटलें, 'शिवबा! तुझें तोंड सुकलेलें दिसतें. तुला तहान का लागली आहे?' महाराजांनीं होय म्हणतांच समर्थांनीं काखेंतील कुबडीनें समोर दगड होता तो बाजूला केला. तों खालून मधुर पाण्याचा झरा वाहूं लागला. तें पाणी पिऊन महाराजांचा जीव अगदीं गार झाला. नंतर बराच वेळ दोघांचीं बोलणींचालणीं होऊन समर्थांचा निरोप महाराजांनीं घेतला व ते परत गेले. महाराजांकरितां जो झरा समर्थांनीं निर्माण केला, तो कुबडीतीर्थ या नांवानें प्रसिद्धीस आला.

---

# सज्जनगड.

एकदां समर्थांचा मुक्काम कळंब्याचे घळींत असतां महाराज त्यांच्या दर्शनास आले, व प्रार्थना करून म्हणाले, "आपला सहवास नेहमीं असावा, अशी माझी फार इच्छा आहे. आपलें राहणें तर कुठे तरी अरण्यांत किंवा पर्वतावर असतें. म्हणून मज दीनावर कृपा करून आपण रायगडीं, प्रतापगडीं, किंवा परळीच्या किल्ल्यावर राहावें व मजकडून सेवा घ्यावी." यावर समर्थांनीं उत्तर केलें, "शिवबा! अरण्यांत पशुपक्ष्यांच्या संगतींत राहणारे आम्ही. आम्हांला गांवांत किंवा किल्ल्यावर राहणें कसें बरें वाटणार? त्यांत तुम्ही राजे लोक; तुमचा सहवास आम्हांला कशाला बरें?" हें उत्तर ऐकून महाराजांना फार वाईट वाटलें. त्यांना दुःख झालेलें पाहून समर्थांनीं परळीच्या किल्ल्यावर राहण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें त्यांची स्वारी निघून परळीवर येऊन राहिली. तेव्हांपासून त्या किल्ल्याला 'सज्जनगड' असें नांव मिळालें. आकाबाई, वेणूबाई व आणखी कांहीं शिष्यमंडळी मग परळीस आली.

तेथें आल्यावर महाराजांनीं समर्थांना जें काय भोजनसाहित्य वगैरे लागेल, तें पुरविण्याकरितां मुद्दाम एका मनुष्याची नेमणूक केली. व एका गांवचा वसूल तिकडे नेमून दिला. त्याचप्रमाणें चांफळच्या मठाचा व देवस्थानचा खर्च चालावा, याकरितां दोनतीन गांवें तिकडे लावून दिलीं. व तेथील कारभार नरसो मलनाथ यास सांगितला.

## अफझुलखानाचा वध.

पुढें महाराजांनीं विजापुरकरांचे राज्यांत धुमाकूळ मांडला. त्यांना वठणीवर आणण्याकरितां बादशाहानें महाराजांचे वडील शहाजी राजे यांचा पुष्कळ छळ केला. पण महाराजांचा बंदोबस्त होईना. तेव्हां अफझुलखान या नांवाच्या सरदारास बादशाहानें महाराजांवर पाठविलें. त्यानें येतांना वाटेंत तुळजापुरच्या देवीची व पंढरीच्या विठोबाची दुर्दशा केली. दुसरीं अनेक देवस्थानें बाटविलीं. असा जिकडे तिकडे त्यानें कहर उडवून दिला. अखेरीस तो अगदीं जवळ येऊन ठेपला. त्याची तयारी फार मोठी होती. तेव्हां त्याच्याशीं लढाई न करितां तह करावा, असा महाराजांनीं बेत केला. त्याप्रमाणें प्रतापगडाखालीं दोघांची भेट होऊन बोलणेंचालणें व्हावें, असें ठरलें. दोघांची भेट झाली. आलिंगन देण्याचे वेळीं खानानें महाराजांची मानगुटी काखेंत दाबली. तेव्हां महाराजांनीं वाघनखांनीं त्याच्या पोटाचा कोथळा बाहेर काढून त्याचा तत्काळ फडशा उडविला. तेव्हां त्याचें सैन्य पळून गेलें.

---

## उत्तम पुरुष.

असा प्रताप गाजवून महाराज समर्थांच्या दर्शनाकरितां आले. समर्थ रामघळींत होते. त्यांना साष्टांग नमस्कार घालून महाराज हात जोडून उभे राहिले. त्या वेळीं समर्थ आपल्या ‘दासबोध’

ग्रंथाची रचना करीत होते. महाराज पुढें उभे राहिलेले पाहू
त्यांच्याच गुणांचें वर्णन एका समासांत ( भागांत ) त्यांनीं केलें
व 'उत्तमपुरुषवर्णन' असें त्याला नांव दिलें. तें वर्णन मोठें गो
आहे. त्यांतल्या कांहीं ओंव्या पहाः—

**शरीर सुंदर सतेज । वस्त्रें, भूषणें केलें सज्ज ।**
**अंतरीं नसतां चातुर्यबीज । कदापि शोभा न पाविजे ॥१।**

म्हणजे—मनुष्याचें शरीर सुरेख आहे, तेजस्वी आहे. वस्त्रांनीं
दागिन्यांनीं तें आणखी सजाविलें; पण अक्कल किंवा चातुर्य नसेल
तर त्या शरीराला कधींही शोभा येणार नाहीं. तात्पर्य, ज्ञा
**हेंच माणसाचें खरें भूषण आहे. इतर भूषणें व्यर्थ.**

**समयासारिखा समयो ये ना । नेम सहसा चालेना ।**
**नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥ २ ॥**

म्हणजे—सगळ्या वेळा सारख्या येत नाहींत. म्हणून वागण्याचा ए
नेम करून चालत नाहीं. **जसा प्रसंग येईल, त्याप्रमाणें वागणू
करून त्या प्रसंगांतून पार पडावें.** एकच नेम कायमचा धरू
ठेवला, तर राजकारण ( राज्याच्या व्यवस्थेचीं कामें, राज्या
विषयींचे डावपेंच ) फसतें.

**अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोनि चालावें ।**
**हटनिग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ॥ ३ ॥**

म्हणजे—कोणतीही गोष्ट अती करणें वाईटच. म्हणून त
केव्हांही करूं नये. **वेळ कशी आहे, तें ओळखून वागावें
विचारी माणसानें एकच हट्ट धरून बसूं नये.** तात्पर्य, व्यवहारां

वागण्याचे नियम असावे; पण प्रसंगाप्रमाणें त्या नियमांत बदल करून प्रसंगांतून पार पडावें. हट्टानें एकच नियम घेऊन बसूं नये.

**बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भवानी ।**
**परंतु विचार पाहोनि । कार्य करणें ॥ ४ ॥**

म्हणजे—ईश्वर तुमचा ( शिवाजीमहाराजांचा ) कैवारी आहे. त्यांतले त्यांत श्रीतुळजाभवानीची तुमच्यावर विशेष कृपा आहे. असें जरी आहे, तरी पुरा विचार केल्यावांचून कोणतेंही काम करूं नये. **प्रत्येक पाऊल विचारानेंच टाकावें.**

**म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचें माजलें बंड ॥**
**याकारणें अखंड । सावधान असावें ॥ ५ ॥**

म्हणजे—म्लेंच्छ हे अती दुष्ट आहेत. आज किती तरी दिवस या देशांत ते प्रबळ होऊन बसले आहेत; म्हणून नेहमीं डोळ्यांत तेल घालून जपून असावें. ते कोणत्या वेळेस काय करतील, याचा नेम नाहीं.

**महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें ॥**
**अद्भुताचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥ ६ ॥**

म्हणजे—कोणतेंही काम सिद्धीस नेण्याकरितां मोठ्या सावधगिरीनें, अगदीं जपून भगीरथप्रयत्न करावे. **कसाही प्रसंग आला, तरी धीर सोडूं नये.** याप्रमाणें धिरानें प्रयत्न केल्यास ईश्वराच्या कृपेनें तुमच्या हातून अचाट कामें होतील.

**धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ॥**
**जाहले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ ७ ॥**

म्हणजे—धर्माचा लोप झाला असतां जे पुरुष पुन्हा त्या धर्माची स्थापना करितात, ते ईश्वराचे अवतार होत. असे अवतारी पुरुष आजपर्यंत अनेक झाले आहेत, व ईश्वराच्या कृपेनें पुढें अनेक होतील.

**सकळ गुणांमध्यें सार । तजविजा विवेक विचार ॥**
**जेणें पाविजे पैलपार । अरत्रपरत्रींचा ॥ ८ ॥**

म्हणजे—प्रत्येक काम मोठ्या विचारानें, मोठ्या युक्तीनें, हरप्रयत्नानें व मोठ्या चातुर्यानें तडीस नेण्याचा गुण हाच सर्व उत्तम गुणांचें सार आहे, उत्तमांतला उत्तम गुण आहे. हा गुण मनुष्याच्या आंगीं असला, म्हणजे तो मनुष्य या लोकीं व परलोकीं धन्य होतो.

या ओंव्या पुष्कळ झाल्या. पण सगळ्याच ओंव्या फार गोड असल्यामुळें त्यांत निवड करतांना हात आवरणें जड जातें. असो.

हा समास लिहून पुरा झाल्यावर समर्थांनीं महाराजांकडे पाहून म्हटलें, " कां शिवबा ! आलास एकदां विजयी होऊन? बस आतां." नंतर पुन्हा नमस्कार करून महाराज बसले. जेव्हां समर्थांच्या आग्रहावरून तो समास त्यांनीं वाचून पाहिला, तेव्हां आनंदाच्या अश्रूंनीं त्यांचे डोळे भरून आले. ते म्हणाले, " महाराज ! आपण अनाथाचे नाथ. रंकाचा राव करणें हें आपलें सामर्थ्य आहे. आपल्या कृपेचा मला सगळा आधार. निमित्ताला मला पुढें करून सर्व कांहीं आपणच घडवून आणतां, आणि मोठेपणा मला देतां. आपली थोरवी मीं काय बोलावी ?" तेव्हां समर्थ हासून म्हणाले, "शिवबा ! तुझी पुण्याई थोर आहे.

तुझ्या हातून मोठीं कामें व्हावीं, अशी रघुपतीची इच्छा आहे." यावर पुन्हा नमस्कार करून महाराज म्हणाले, " आपण काय म्हणतां तें कांहीं मला समजत नाहीं. माझ्या हातून आपण सेवा घेत आहां, यांतच मला आनंद आहे."

नंतर समर्थ म्हणाले, " अफझुलखानाच्या संकटांतून तूं कसा पार पडलास ?" तेव्हां महाराजांनीं म्हटलें, " ज्या वेळेस खानानें मला काखेंत दाबलें, त्या वेळीं मी भानावर नव्हतों. त्याचे काखेंतून सुटतांना मी लहान झालोंसें मला वाटलें. खानाचे मिठींतून सुटणें कठिण; पण आपल्या आशीर्वादानेंच सुटलों. त्या वेळीं मला असा आवेश चढला होता कीं, खानासारखे शंभर खान असते, तरी त्या सगळ्यांच्या नरडीचा घोंट मी तेव्हांच घेतला असता. पण हा सगळा केवळ आपल्या पायांचा प्रताप ! " असें भाषण करितांना त्यांचे डोळे भरून आले. तेव्हां समर्थ म्हणाले, "शाबास! शिवबा शाबास !! तुझ्या हातून अद्याप पुष्कळ अशीं कामें पार पडावयाचीं आहेत. तीं पार पाडणार श्रीराम समर्थ आहे."

मग महाराजांनीं विनंती केली कीं, " कांहीं तरी सेवा घ्यावी, अशी मी नित्य प्रार्थना करितों. पण तिकडे आपलें लक्ष नाहीं. यास्तव कांहीं तरी आज्ञा व्हावी." महाराजांची ही भक्ति पाहून समर्थ म्हणाले, "मीं अकरा ठिकाणीं मारुतीची स्थापना केली आहे. शिवाय डोलगांवीं गुहेंत मारुती आहे. त्यांच्या नैवेद्याचा बंदोबस्त करावा." अशी आज्ञा होतांच महाराजांनीं मारुतीच्या प्रत्येक गांवीं अकरा बिघे जमीन त्याच्या नैवेद्याकरितां लावून दिली. नंतर आज्ञा घेऊन महाराज परत गेले.

# महाराजांचे डोळ्यांत अंजन.

पुढें महाराजांनीं करवीर प्रांतांत सामनगड या नांवाचा किल्ला बांधण्यास आरंभ केला. किल्ल्याचे तटापुढें मारुतीचें एक स्वयंभू स्थान होतें. किल्ल्यावरून तेथें जाण्याकरितां मार्ग करावयाचा होता. त्याचा विचार करण्याकरितां महाराज स्वतां एक दिवस तेथें आले. तों हजारों मनुष्यें काम करीत आहेत, असें पाहून इतक्या मनुष्यांचा आज मी पोशिंदा आहें, असा गर्वाचा विचार त्यांच्या मनांत आला. त्याच विचारांत ते फिरत होते. इतक्यांत समर्थ तेथें आले. महाराजांनीं त्यांना साष्टांग नमस्कार घातला व विचारलें, " अकस्मात् कोठून येणें झालें ? " तेव्हां समर्थांनीं उत्तर केलें, " तुझ्या किल्ल्याचा कारखाना पहावा, म्हणून सहज आलों." पुढें दोघे कारखाना पहात पहात चालले. ते रस्त्याचें काम चालू होतें, तेथें आले. तों मध्येंच एक मोठा दगड तसाच कायम ठेवलेला दिसला. तो पाहून समर्थ म्हणाले, "हा एकच धोंडा मध्यें कां राखून ठेविला ?" महाराजांनीं उत्तर केलें, "सगळा रस्ता झाल्यावर मग तो दगड फोडावा, असा विचार आहे. " समर्थ म्हणाले, " हाताबरोबर काम करून घ्यावें. पुढें होत नाहीं. " तेव्हां बेलदारांस बोलावून त्यांच्याकडून दगड फोडण्यास सुरवात करविली. सुमारें अर्धा दगड फोडून झाल्यावर समर्थ म्हणाले, " धोंड्याचे मध्यभागीं घाव न घालतां सभोंवार फोडावा. " त्याप्रमाणें काम होऊं लागलें. शेवटीं मध्यभागचा नारळाएवढा गोटा राहिला. त्या वेळीं त्याचे युक्तीनें दोन

भाग करण्यास समर्थांनीं सांगितलें. त्याप्रमाणें त्याचीं दोन छकलें केलीं. तेव्हां त्याचा आंतला भाग पोकळ असून त्यांत पाणी व त्या पाण्यांत एक बेडकी आहे, असें आढळून आलें. तेव्हां समर्थ म्हणाले, "शिवबा! काय तुझी करामत तरी! पहा या दगडामध्यें खळगा करून व त्यांत पाणी घालून एका बेडकीच्या पोषणाची तजवीज तूं केलीस. हें कोणाच्याही हातून व्हावयाचें नाहीं." हें समर्थांचें भाषण ऐकून महाराज म्हणाले, "स्वामी! अशी गोष्ट मजकडून कशी घडेल बरें?" यावर समर्थांनीं उत्तर केलें, "तुजवांचून दुसरा कर्ता कोण आहे?" हें भाषण ऐकून महाराज मनांत चरकले. माझ्या हातून कांहीं तरी अपराध झाला असावा, म्हणून समर्थांचे तोंडून अशीं अक्षरें निघत आहेत, असें त्यांना वाटलें. व समर्थांचे चरणीं मस्तक ठेवून हात जोडून ते म्हणाले, "माझे हातून कांहीं अपराध झाला असल्यास त्याची समर्थांनीं क्षमा करावी." एवढें बोलल्यावर महाराजांचा गळा भरून आला.

तेव्हां समर्थांना त्यांची दया आली. ते म्हणाले, "बाबा! लक्षावधि माणसांचें पोषण तूं करतोस; आणि या बेडकीचें पोषण तुला होत नाहीं?" यावर महाराजांनीं विनंती केली, "मी अपराधी खरा, पण क्षमा करणें आपलेकडे आहे." समर्थ म्हणाले, "बाबा! तूं श्रीरामाचा सेवक. तुझ्या हातून लाखों माणसांना तो शेर देवावितो. तूं केवळ निमित्तमात्र आहेस. असें असतां तुझ्या मनांत अभिमान उत्पन्न झाला, हें बरें नाहीं." महाराजांनीं आपली चूक कबूल करून पुन्हा क्षमा मागितली. मग समर्थ म्हणाले, "तुझा चूक तुला दाखवून तुला क्षमा करण्याकरितांच मी येथें

मुद्दाम आलों. आतां जातों मी." त्या वेळीं दोनप्रहरचा समय झाला असल्यामुळें भोजन करून जावें, अशी महाराजांनीं विनंती केली. ती मान्य करून समर्थ राहिले. स्नानसंध्या, भोजन, वगैरे आटोपलें. तें झाल्यावर किल्ले, इमारती वगैरे कारखाने कसे करावे, त्यांना लागणारें सामान वगैरे कसें असावें, तें कसें तयार करावे, वगैरे माहिती समर्थांनीं महाराजांस सांगितली. ती माहिती फार चांगली आहे. समर्थ बैरागी असून त्यांना ही माहिती कशी झाली, याचें नवल वाटतें. व **ज्यानें श्रीरामाला पूर्ण वश करून घेतलें,त्याच्या ठिकाणीं अज्ञान कसलेंच शिल्लक राहात नाहीं**, हें सत्य मनावर ठसतें. असो. महाराजांच्या आग्रहावरून आणखी दोनतीन दिवस तेथें राहून समर्थ सज्जनगडीं परत गेले.

---

## रामराम !

एके समयीं महाराज समर्थांचे दर्शनास आले असतां नेहमीं-प्रमाणें साष्टांग नमस्कार घालून म्हणाले, "महाराज! कांहीं तरी मजकडून सेवा घ्यावी, अशी मी वारंवार प्रार्थना करतों; पण कांहीं आज्ञा होत नाहीं. असें कां ? सेवा करण्याची माझी योग्यताच नाहीं काय ?" समर्थांनीं उत्तर केलें, "स्वराज्याकरितां तुझा उद्योग चालला आहे. म्लेंच्छांचा बंदोबस्त करून धर्म, देव, ब्रा-ह्मण व गाई यांचें उत्तम रक्षण तुझ्याकडून होत आहे. ही आ-

मची सेवा नव्हे का?" महाराज म्हणाले, " या गोष्टी आपल्या आज्ञेनेंच होत आहेत. तेव्हां ती आपली सेवा आहे, यांत कांहीं खोटें नाहीं. पण आपली प्रत्यक्ष अशी कांहीं तरी सेवा व्हावी, अशी इच्छा फार आहे." यावर किंचित् हासून समर्थ म्हणाले, " जें मागेन तें देशील ना? पहा हो!" महाराजांनीं उत्तर केलें, " हा देह आपला आहे. सर्व राज्य व ऐश्वर्य आपलेंच आहे. जास्त काय बोलूं? जें मागणें तें खुशाल मागावें." यावर समर्थांनीं तीन गोष्टी मागितल्या. त्या या:—

१ दर वर्षी श्रावण महिन्यांत एक कोटी पार्थिव लिंगें करीत जावीं. व त्याबद्दल ब्राह्मणभोजन वगैरे करीत जावें.

२ श्रावणमासीं परीक्षा घेऊन ब्राह्मणांस दक्षिणा द्यावी.

३ आपलें राज्य हिंदूंचें आहे. तेव्हां एकमेकांस म्लेंच्छाप्रमाणें ' जोहार ' करणें हा आपला धर्म नाहीं. याकरितां हिंदूंनीं एकमेकांस 'रामराम' असें म्हणावें, व कागदोपत्रींही एकमेकांस 'रामराम' म्हणून लिहीत जावें. यापुढें कोणींही हिंदूनें 'जोहार' असें म्हणूं नये.

हें ऐकून महाराजांनीं त्याप्रमाणें व्यवस्था करण्याचें कबूल केलें, व ते आज्ञा घेऊन निघून गेले. समर्थांच्या आज्ञेप्रमाणें महाराजांनीं तिन्ही गोष्टी लौकरच आपल्या राज्यांत सुरू केल्या. ' रामराम' म्हणण्याची व लिहिण्याची चाल तेव्हांपासून सुरू झाली. ती अद्याप चालू आहेच.

# कोणाचा मत्सर नसावा.

एकदां स्वामी रामघळींत होते. जवळ शिष्यमंडळी होती. समर्थांची कृपा कल्याणांवरच फार आहे. ते त्यांनाच नेहमीं नेहमीं कामें सांगतात. अशी कुरबूर त्यांच्यांत सुरू असे. एके दिवशीं मध्यरात्र झाल्यावर समर्थांनीं विडा मागितला. म्हणून शिष्य उठून विड्याची तजवीज पाहूं लागले. तों पानें शिल्लक नाहींत, असें त्यांना दिसून आलें. तेव्हां ते पंचायतींत पडले. विडा लौकर आणा, असा समर्थांचा इकडे तगादा लागला. शेवटीं, पानें नाहींत, असें शिष्यांनीं त्यांना सांगितलें. त्या वेळीं समर्थांनीं कल्याणांस हाक मारून म्हटलें, "कल्याणा! आत्तांच्या आतां विड्याचीं पानें पाहिजेत." 'आज्ञा महाराज,' असें म्हणून कल्याण गोसांवी तेवढ्या रात्रीं पानें आणण्याकरितां एकटे चांफळास जाण्याकरितां निघाले. अंधारी रात्र, त्यांत मध्यरात्रीचा समय; यामुळें वाट कांहीं दिसेना. अर्धा पर्वत उतरून आल्यावर एका सर्पाच्या शेंपटीवर त्यांचा पाय पडला. त्याबरोबर त्या सर्पानें त्यांच्या पोटरीला कडकडून चावा घेतला. तेव्हां, 'जय-जय रघुवीर समर्थ! कृपा असावी.' असें म्हणून ते जमिनीवर बेशुद्ध पडले. ते शब्द समर्थांनीं ऐकले, व ते चुडी पेटवून, काय झालें तें पाहण्याकरितां आले. तेव्हां गोसांवी बेशुद्ध होऊन पडले आहेत, व पलीकडे एक सर्प बसला आहे, असें त्यांना दिसलें. तितक्यांत तो सर्प चालता झाला. नंतर स्वामी कल्याणांजवळ गेले. तेथें बहिरोबाची मूर्ति होती; त्या बहिरोबाला त्यांनीं असा नवस

केला कीं, माझ्या कल्याणाची बाधा तूं दूर कर. म्हणजे तुझ्या नांवानें अकरा मण गूळ वांटीन. असा नवस करून त्यांनीं कल्याणांच्या सर्व आंगावरून हात फिरविला व म्हटलें, "बाबा कल्याणा ऊठ !" त्याबरोबर कल्याण गोसांवी सावध झाले व समर्थांना नमस्कार करून पानें आणण्यास जाऊं लागले. तेव्हां स्वामी म्हणाले, "आतां जाऊं नको. मला विडा पावला." असें म्हणून कल्याणांस हातीं धरून ते घळींत आले.

मग सगळ्या शिष्यांना म्हणाले, "कल्याणावरच माझी कृपा आहे. मी त्यालाच कामें सांगतों, असें तुम्ही म्हणतां व त्याचा मत्सर करितां; म्हणून आज मीं तुमच्याजवळ अशा मध्यरात्रीं मुद्दाम विडा मागितला. पण पानें नाहींत, असें पाहून तुम्ही स्वस्थ बसलां; आणि पानें पाहिजेत, असें म्हणतांच कल्याण काळवेळ कांहीं न पाहतां पानांकरितां एकदम बाहेर पडला. तुमची निष्ठा माझ्यावर किती आहे, व त्याची किती आहे, याचा यावरून विचार करा. बाबांनो ! कोणाची कृपा कोणावर उगीच बसत नसते. **नुसता दुसऱ्याचा मत्सर करून आपलें हित कधींही होत नाहीं. लोकांकरितां जो आपल्या जिवाकडे पहात नाहीं, त्याच्यावर लोकांची कृपा सहजच होते. आपल्या हातून जेवढी लोकांची सेवा होईल, तेवढी मनापासून करावी, व आनंदानें असावें. जो खऱ्या भावानें काम करणारा असतो, त्यालाच कोणीही काम सांगतें.** मी कल्याणासच काम सांगतों, याचें कारण हें असें आहे. **चंदन स्वतां झिजतो, म्हणून लोक त्याला प्रेमानें जवळ करितात.** तुमची तशी निष्ठा दिसली, म्हणजे तुम्हांसही मी काम सांगेन." हें समर्थांचें भाषण ऐकून सर्व शिष्यांनीं

खालीं माना घातल्या. ' आम्ही अपराधी आहों, क्षमा असावी, ' असें म्हणून त्यांनीं समर्थांना साष्टांग नमस्कार घातले. तेव्हां समर्थांनीं त्यांना आशीर्वाद दिले.

---

## राणूबाईचा मृत्यु.

इतक्यांत मातोश्री फार आजारी आहे, असें कळतांच समर्थ तिची भेट घेण्याकरितां जांबेस गेले. तिची शेवटचीच वेळ आलेली होती. श्रेष्ठांचे मांडीवर उसें ठेवून त्यांच्या मुखाकडे प्रेमानें पाहून ती म्हणाली, 'माझ्या नारोबाची भेट कांहीं होत नाहीं.' इतक्यांत समर्थ तेथें पोंचले व ' जयजय रघुवीर समर्थ ! ' असे शब्द त्यांनीं उच्चारले. ते ऐकून राणूबाईचें तोंड आनंदानें प्रफुल्लित झालें. समर्थ तिच्याजवळ जाऊन व तिला नमस्कार करून खालीं बसले. तेव्हां त्यांच्याकडे डोळे भरून तिनें पाहिलें, व ती आपल्या दोन्ही पुत्रांना म्हणाली, " तुम्हीं दोघांनीं माझे पोटीं येऊन कुळाचा उद्धार केला. यानेंच मी धन्य झाल्यें. आतां मी सुखानें मरत्यें. " त्यावर त्या उभयतां पुत्रांनीं उत्तर केलें, " आई ! ही सगळी तुझी पुण्याई आहे बरें ! कुळाचा उद्धार आम्हीं केला नाहीं. जें काय आमचे हातून झालें आहे, तें केवळ तुझ्या आशीर्वादानें. तुझी योग्यता फार थोर आहे. तुझ्या पोटीं आमचा जन्म झाला, म्हणून आमच्या जन्माचें कांहीं तरी सार्थक झालें. तुझ्यासारख्या मातेच्या पोटीं जन्म येणें ही सामान्य गोष्ट

नाहीं. आतां तूं कांहीं विचार मनांत न आणतां श्रीरामाच्या पायांकडे लक्ष ठेव, म्हणजे तो आपल्या पायांजवळ तुला अढळ स्थान देईल. मग तुला जन्म घेऊन या दुःखमय संसारांत यावें लागणार नाहीं." असें पुत्रांनीं सांगतांच तिनें, 'उत्तम आहे,' असें म्हटलें व 'राम राम' असे शब्द उच्चारीत प्राण सोडला. मग दोघां पुत्रांनीं धर्माप्रमाणें जे काय पुढील विधि करावयाचे, ते यथास्थित केले. पंधरा दिवस झाल्यावर समर्थ परळीस आले.

---

## भगवा झेंडा.

एकदां शिवाजीमहाराज साताऱ्यास असतां समर्थ भिक्षा मागत मागत राजवाड्यांत आले. तेव्हां महाराजांनीं एक चिट्ठी त्यांचे झोळींत टाकली व साष्टांग नमस्कार घालून ते हात जोडून उभे राहिले. समर्थांनीं विचारलें, "शिवबा! झोळींत काय टाकलें?" महाराजांनीं उत्तर केलें, 'स्वामीमहाराज! भिक्षा घातली.' असें महाराजांचें उत्तर ऐकून समर्थांनीं झोळींतून ती चिट्ठी बाहेर काढली व उद्धवाकडून वाचविली. 'आजपर्यंत जें कांहीं राज्य मिळविलें, तें सर्व स्वामींस अर्पण असो.' असा मजकूर तींत होता. तो ऐकून समर्थ म्हणाले, "शिवबा! आम्हांला राज्य अर्पण करून तूं काय करणार?" "आपल्याजवळ नेहमीं राहून आपली सेवा करणार." असें उत्तर महाराजांनीं दिलें. तेव्हां समर्थ म्हणाले, "ठीक आहे. आमचेबरोबर चलावें." असें म्हणून समर्थांनीं आपली झोळी महाराजांचे खांद्यावर दिली व त्यांच्यासह भिक्षेस निघाले.



" आपल्याजवळ नेहमीं राहून आपली सेवा करणार ! "

[ पान ४२.

रोज दहापांच घरेंमात्र भिक्षा मागण्याची समर्थांची वाहवाट होती. पण त्या दिवशीं सगळीं घरें त्यांनीं टिपून घेतलीं. तों दुपार झाली. म्हणून परळीस न जातां ते वेण्णेचे कांठीं गेले. तेथें शिष्याचे हातीं रानशेणी आणविल्या व दगडावर पीठ मळून पानगे भाजविले; व मग ते सर्वांना वांटून दिले. ते खाऊन झाल्यावर समर्थांनीं प्रश्न केला, "शिवबा! आमच्यापाशीं राहण्यांत कसें सुख आहे पाहिलेंस?" महाराज म्हणाले, "या सुखाचाच मी भुकेला आहें." तें उत्तर ऐकून समर्थांना संतोष वाटला. मग ते म्हणाले, "शिवबा! आमची आज्ञा तुला मानावयाची आहे ना? तर असें कर. हें राज्य तूंच चालीव. तें तूं चांगल्या रीतीनें चालवावें, यांतच आमची सेवा आहे. **क्षत्रियानें उत्तम राज्य चालवून प्रजेला सुखी करावें व ब्राह्मणानें तपश्चर्या करून राजाचें व त्याच्या राज्याचें हित चिंतावें. ब्राह्मणांचा व क्षात्रियांचा हाच एक धर्म आहे. तो दोघांनींही चालवावा, यांतच देशाचें कल्याण आहे. ब्राह्मणांना वैभवाची इच्छा झाली व क्षत्रियांना ब्राह्मण होण्याची इच्छा झाली कीं, देशावर संकट आलेंच.**" समर्थांचें हें भाषण ऐकून महाराज म्हणाले, "आपली आज्ञा मला मान्य आहे. पण एक तरी माझी विनंती ऐकावी. आपल्या आज्ञेप्रमाणें आपलें म्हणून मी राज्य चालवितों. पण आपल्या पादुका मला द्याव्या. म्हणजे मला बरें वाटेल. त्यांच्या नांवानें मी आनंदानें राज्य चालवीन. त्याचप्रमाणें हें सगळें राज्य आपलें आहे, हें दाखविण्याकरितां राज्याचें निशाण भगव्या रंगाचें ठेवावें, असें माझ्या मनांत आहे. ही माझी दुसरी विनंती स्वामींनीं मान्य करावी." समर्थांनीं या दोन्ही गोष्टींस आपली कबुली दिली; व आपल्या पादुका महा-

राजांच्या स्वाधीन केल्या. तेव्हांपासून मराठ्यांचें निशाण भगव्या रंगाचें झालें. असो.

---

## सावधपणा.

पुढें महाराजांनीं आणखी अशी विनंती केली कीं, राज्याचा कारभार मीं करावा, अशी मला आज्ञा झाली. पण राज्य चालवितांना कसें वागावें, कोणती सावधगिरी बाळगावी, याबद्दल आज्ञा व्हावी. आजपर्यंत मीं स्वतांच्या व कारभाऱ्यांच्या विचारानें काम केलें. आतां आपण मार्ग दाखवावा, म्हणजे त्या मार्गानें जाण्यास ठीक पडेल. हें महाराजांचें भाषण ऐकून समर्थांनीं त्यांना बोध केला. तो फारच उत्तम आहे. सामान्य माणसांनाही जगांत वागतांना तो उपयोगीं पडण्यासारखा आहे. म्हणून त्यांतल्या अगदीं थोड्या निवडक ओंव्या येथें द्याव्या, असा हेतु आहे. त्या ओंव्यांचा सारांश सांगतां येईल. पण समर्थांच्या वाणींत जें तेज आहे, तें माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या वाणींत कसें येणार? म्हणून मूळच्या ओंव्याच देतों. म्हणजे मुलांनो! त्या तुमच्या लक्षांतही लौकर राहतील.

**कोणाचा भरंवसा न धरावा। आपुला आपण विचार पहावा।**
**तकवा उदंड धरावा। हाही एक विषयीं॥ १॥**

म्हणजे—कोणाही माणसाचा भरंवसा धरूं नये. प्रत्येक गोष्ट आपण आपल्या मनाशीं पूर्ण विचार करून ठरवावी, व आपल्या

कामाची व्यवस्था स्वतः लावावी. अमुक मनुष्य **माझें काम करील, असा भरंवसा धरून कधीं स्वस्थ बसूं नये.** कोणतेंही काम मोठ्या हुरुपानें करावें. व आंगीं जेवढा हुरूप असेल, तेवढा सगळा त्याच कामाकडे खर्च करावा. एका वेळीं एकच काम हातीं घ्यावें; व आपली सगळी करामत त्या कामाकडे लावावी.

**देहदुःखें कदरों नये । उदंडाचे करावे उपाय ।**
**मग सर्व सुखास काय । उणें आहे ॥ २ ॥**

म्हणजे—काम करितांना शरीराला कष्ट होतात, म्हणून त्रासून कंटाळूं नये. हातीं घेतलेलें काम शेवटास नेण्याकरितां कसून प्रयत्न करावे. असें केल्यास सुखाला कांहीं कमी पडणार नाहीं. सर्व सुखें तुमच्या पायांशीं लोळत पडतील.

**एकान्तीं चाळणा करावी । धारणा उदंड धरावी ।**
**नाना विचारणा करावी । अरिमित्रांची ॥ ३ ॥**

म्हणजे—एकान्त स्थळीं जाऊन व मन पूर्ण स्वस्थ करून आपले शत्रु कोण व आपले मित्र कोण, याचा अगदीं बारकाईनें विचार करावा.

**प्रयत्नीं चुकों नये । सुखवासी कामा नये ।**
**सुचावे नाना उपाय । अनेक विषयीं ॥ ४ ॥**

म्हणजे—प्रयत्न किंवा उद्योग करण्याची हयगय करूं नये. सुखांत किंवा चैनींत दंग होऊं नये. कारण, सुखाची चटक लागली, म्हणजे आंगांत आळस भरतो, व उद्योगाचा वीट येतो. कोणतेंही काम असलें, तरी तें तडीस नेण्याला चातुर्यानें अनेक युक्त्या लढवाव्या.

**जेथें बहु विचार । तेथें ईश्वर–अवतार ।**
**मागें झाले थोर थोर । धक्के चपेटे सोसूनी ॥ ५ ॥**

म्हणजे—जो मनुष्य कोणतेंही काम अगदीं खोल विचार करून करतो, तोच अवतारी पुरुष होय. आजपर्यंत अनेक थोर थोर पुरुष होऊन गेले, पण अनेक दुःखें त्यांनीं भोगलीं, तेव्हां त्यांना थोरपण आलें. **थोरपण सुखासुखीं मिळत नाहीं.**

**इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहूं नये ।**
**लिहावयाचें सांगूं नये । जबाबीनें ॥ ६ ॥**

म्हणजे—जें नुसत्या खुणेनें सांगावयाचें असेल, तें बोलून किंवा शब्दांनीं सांगूं नये, जें तोंडानें सांगण्याला योग्य असेल, तें कधींही लिहून कळवूं नये, व जें लिहूनच कळवावयाचें असेल, तें तोंडानें कधीं सागूं नये.

असा किती तरी सुंदर उपदेश समर्थांनीं महाराजांना केला. तो येथें किती सांगावा ! तो ऐकून महाराजांना फारच आनंद झाला. त्यांचा कंठ भरून आला. डोळ्यांतून आनंदाच्या अश्रूंचे पूर वाहूं लागले. त्यांची ती स्थिति झालेली पाहून समर्थांनाही आनंद झाला. कांहीं वेळानें समर्थांची आज्ञा घेऊन महाराज साताऱ्यास परत गेले.

---

## महाराजांना राज्याभिषेक.

शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्र,कर्नाटक वगैरे प्रांत मुसलमानांचे जुलमांतून सोडवून तेथें आपला अंमल चालू केला. त्यामुळें स-

गळे लोक सुखी झाले. पण त्यांनीं आपणांस राज्याचा अभिषेक करून घेतला नव्हता. असा अभिषेक जोंपर्यंत झाला नाहीं, तोंपर्यंत कोणालाही ' राजा ' असें नांव मिळत नाहीं, व त्याच्या ताब्यांत कितीही मुलूख असला, तरी त्याला ' राज्य ' असें म्हणतां येत नाहीं.

अशी स्थिति असल्यामुळें महाराजांनीं आपणांस अभिषेक करून घ्यावा, अशी विनंती त्यांच्या कारभाऱ्यांनीं केली. पण महाराज तसें करण्यास कबूल होतना. तेव्हां, श्रीभवानीला विचारावें, व तिच्या आज्ञेप्रमाणें करावें, असें ठरलें. श्रीभवानीला प्रश्न करितांच तिनें महाराजांच्या आंगांत येऊन, शिवबानें समर्थांच्या विचारानें आपणास अभिषेक करून घ्यावा, असें सांगितलें. मग तिच्या आज्ञेप्रमाणें महाराज वागण्यास तयार झाले.

पुढें कारभारीमंडळीनें ती हकीगत समर्थांचे कानांवर घातली. ती ऐकून त्यांना संतोष झाला. त्यांनीं लागलीच अशी आज्ञा केली कीं, गंगाधरशास्त्री पैठणास गेले आहेत, त्यांस आणवून त्यांच्या विचारानें राज्याभिषेकाची तयारी करावी. या आज्ञेप्रमाणें गंगाधरशास्त्री यांस आणण्याकरितां मनुष्यें रवाना झालीं. गंगाधरशास्त्री रायगडीं आले. महाराजांनीं सामोरे जाऊन मोठ्या समारंभानें त्यांना घरीं आणलें.

राज्याचीं सर्व चिन्हें पहिल्यानें समर्थांना अर्पण करावीं, व मग आपण त्यांच्या आज्ञेप्रमाणें सिंहासनावर बसावें, असें महाराजांनीं मनांत आणलें. त्याप्रमाणें समर्थांकडे जाऊन त्यांनीं विनंती केली. ती ऐकून समर्थ म्हणाले, " शिवबा ! काय बरें तुझें मागणें हें ? आमच्या वेषाला हें शोभेल तरी ? बाबा ! हा

आमचा धर्म नव्हे. उगीच आम्हांला बट्टा लागेल, असें कां करावें ? " तेव्हां महाराज म्हणाले, " भक्ताची इच्छा देवानें पूर्ण करावी, हेंच योग्य आहे. याकरितां समर्थांनीं मला एवढें देणें दिलेंच पाहिजे. भक्ताचे हेतु पूर्ण करणें हाच देवाचा खरा धर्म आहे. त्याप्रमाणें वागल्यानें आपणांस दोष कसा लागेल बरें ? उलट न वागल्यानेंच आपल्या हातून अधर्म होईल. " अशी महाराजांनीं अनेक प्रकारें त्यांची विनवणी केली. तेव्हां समर्थ म्हणाले, " बरें बाबा तुझी इच्छा. " मग महाराजांनीं मोठ्या समारंभानें समर्थांचा जटाभार उतरविला व त्यांना मंगलस्नान घालून सर्व राजचिन्हें मोठ्या भक्तीनें त्यांना अर्पण केलीं. मोठ्या थाटानें ब्राह्मणभोजन घातलें. दानधर्मही पुष्कळ केला. नंतर कांहीं दिवस राहून समर्थांची आज्ञा घेऊन ते जाण्यास निघाले. तेव्हां समर्थांनीं सांगितलें, " आतां कांहीं शंका मनांत न आणतां शास्त्रीबावांचे विचारानें कार्य शेवटास न्यावें." 'आज्ञा,' असें म्हणून महाराज तेथून निघाले.

मग पहिल्यानें शास्त्राप्रमाणें महाराजांची मुंज झाली. नंतर अभिषेक होऊन ते सिंहासनावर बसले. तेव्हां शिवाजी महाराज महाराष्ट्राचे खरे राजे झाले. व महाराष्ट्रांत मराठ्यांचें राज्य स्थापन झालें. महाराष्ट्र गुलामपणांतून सुटून स्वतंत्रतेचें सुख अनुभवूं लागला. समर्थ व शिवाजी महाराज यांचे महाराष्ट्रावर केवढे बरें उपकार झाले हे ! श्रीशिवाजी महाराज यांचें स्मरण झाल्याबरोबर व त्यांचें नांव निघाल्याबरोबर अद्यापही आपणांस आनंद व त्यांच्याबद्दल आदर वाटतो. याचें कारण हेंच आहे. **खरें सुख स्वतंत्रतेंत आहे. परतंत्रता किंवा गुलामपण हें अत्यंत दुःख-**

दायक आहे. नरकापेक्षांही परतंत्रता वाईट आहे. तेव्हां ती परतंत्रता नाहींशी करून ज्यानें सर्व महाराष्ट्राला स्वतंत्र केलें, त्याला आम्हीं देवाप्रमाणें मानावें, त्याचे उत्सव करावे, यांत नवल काय ? असो.

हा समारंभ रायगडीं झाला ( शके १५९६ ). त्या वेळीं महाराजांनीं खूप दानधर्म केला. समारंभ आटोपल्यावर महाराज समर्थांचे दर्शनाकरितां मुद्दाम आले. दोघे पुत्र,— संभाजी व राजाराम,—सर्व कुटुंबांतील माणसें, अष्टप्रधान वगैरे सर्व परिवार बरोबर आणला होता. समर्थांचें दर्शन झाल्यावर महाराजांनीं त्यांची मोठ्या थाटानें पूजा केली. त्या वेळीं महाराजांना पाहून समर्थांना जो आनंद झाला, त्याचें वर्णनच करितां येणार नाहीं. महाराष्ट्राला मुसलमानांच्या जांचांतून सोडविण्याकरितां आपण जो इतका उद्योग केला, तो आज खरा फळास आला, असें त्यांना वाटलें. व महाराजांना मोठ्या प्रेमानें जवळ बसवून घेऊन त्यांनीं त्यांच्या पाठीवर हात फिरवीत म्हटलें, " शिवबा ! धन्य आहेस तूं ! खरोखरच धन्य ! रघुपतीच्या कृपेनें आज हा सोन्याचा दिवस उगवला, हें पाहून मला किती समाधान होत आहे म्हणून सांगूं ! रघुपतीनें तुझ्या हातून पराक्रम करवून सगळ्या महाराष्ट्राला दुःखांतून सोडविलें. यावरून त्याची तुझ्यावर केवढी बरें कृपा आहे ! " हें सर्व भाषण ऐकून महाराज म्हणाले, " स्वामी ! आपण मला उगीच मोठेपण देऊन कां बरें लाजवितां ? माझी अशी काय योग्यता आहे ? जें कांहीं माझे हातून झालें,तें याच पायांच्या कृपेनें झालें. श्रीराम व आपण यांत मला तर कांहीं अंतर दिसत नाहीं. "

समर्थ हासून म्हणाले, " शिवबा ! बरें, श्रीरामाची मर्जी होती तसें एकंदरींत सगळें ठीक झालें. आनंद आहे. " नंतर कांहीं दिवस सर्व मंडळी तेथें मोठ्या आनंदानें राहिली. महाराज समर्थांच्या देखत कोणतेंही राजचिन्ह धारण करीत नसत. पुढें समर्थांचे आशीर्वाद घेऊन सर्व मंडळी रायगडीं परतली.

---

## रामाच्या डोळ्यांत तिखट !

समर्थांचा परळीस एक बोका होता. जेवणाचे पूर्वीं रोज त्याला समर्थ दहींभात व दूधभात घालीत. त्याची पाणी पिण्याची एक वाटी होती, तींत पाणी घालून त्याला पाजीत. याप्रमाणें त्याचें खाणेंपिणें झालें, म्हणजे, रामा ! तूं तृप्त झालास ना? असा त्याला प्रश्न करून मग आपण भोजनास आरंभ करीत.

पण तो बोका मठांतील दूधदुभतें खाऊन फार उपद्रव देई; म्हणून एक दिवस एकानें त्याला धरून त्याचे डोळ्यांत खूप तिखट टाकलें. त्या दुःखानें घाबरा होऊन तो बोका तळमळत जाऊन लपून बसला. पुढें समर्थांची स्नानसंध्या होऊन श्रीरामाला नैवेद्य अर्पण केल्यानंतर भोजन वाढून तयार झालें. तेव्हां रामास बोलवा, अशी आज्ञा झाली; त्यावरून सगळ्यांनीं तपास केला; पण तो कोठें सांपडेना. तो सांपडत नाहीं, असें मग त्यांनीं समर्थांना सांगितलें. त्यावर समर्थ म्हणाले, " त्याला कोणीं कांहीं तरी केलें असेल, म्हणून तो आला नाहीं. पण तो आल्यावांचून

आम्ही भोजन करणार नाहीं. त्याचा शोध करून त्याला घेऊन या." तेव्हां किल्लयावरील प्रत्येक घरीं तपास केल्यावर एका ठिकाणीं तो सांपडला. त्याला आणलें, तेव्हां त्याचे डोळे लाल होऊन त्यांतून सारखें पाणी गळत होतें. तें पाहून समर्थ म्हणाले, "रामा! तुला कोणीं उपद्रव दिला बरें? तूं रडतोस कां?" असें बोलून त्यांनीं त्याच्या आंगावरून मोठ्या लाडिवाळपणानें हात फिरविला व त्याला रोजच्या क्रमाप्रमाणें भात घातला. पण तो मुळींच खाईना. तेव्हां समर्थांनीं मोठ्या युक्तीनें काय झालें, याचा तपास चालविला.तेव्हां एकानें असें सांगितलें कीं,"दूधदुभत्याला याचा उपद्रव फार होतो, म्हणून एकानें याचे डोळ्यांत तिखट घातलें." तें ऐकून समर्थ म्हणाले, "तुम्ही सर्व खाणार आणि हा कोणी चोर आहे कीं काय? हाही त्या रघुपतीचाच जीव आहे. बाबांनो! **जसा आपला जीव,तसाच इतरांचा जीव, असें जाणून कोणत्याही प्राण्याला दुःख देऊं नये.** तुमच्या दूधदुभत्याचा बंदोबस्त तुम्ही नीट करा, म्हणजे तो खाणार नाहीं. **मनुष्यांना अक्कल असूनही ज्या गोष्टी करूं नयेत, त्या तीं करितात. दुसऱ्याचें जें कांहीं उपटायला मिळेल, तें उपटतात.** मग हा तर बोलूनचालून पशु आहे. यानें तुमच्या दुभत्यावर ताव मारला, तर त्यांत काय विशेष झालें?" असें बोलून समर्थांनीं आपले हातांनीं त्याचे डोळ्यांस तूप लावलें. मग त्याला प्रेमानें जेवायला घालून नंतर आपण भोजन केलें.

# श्रेष्ठांनीं देह ठेविला.

श्रेष्ठ संसारांत होते. रामचंद्रबावा व श्यामजीबावा असे त्यांना दोन मुलगेही होते. पण ते संसारांत रगून गलले नव्हते. त्यांच्या कुळांत परंपरेनें चालत आलेली श्रीरामाची भक्ति त्यांनीं उत्तम प्रकारें चालविली होती. त्यामुळें श्रीरामाची त्यांच्यावर पूर्ण कृपा होती. समर्थ व श्रेष्ठ या दोघांची योग्यता सारखीच होती. समर्थांनीं कृष्णेच्या कांठीं चांफळखोऱ्यांत राहून लोकांना श्रीरामाच्या भजनीं लावलें व श्रीशिवाजी महाराजांना स्वराज्याची स्थापना करण्याचे कामीं उत्तम प्रकारची मदत केली. सर्व देशांत जागजागीं सात—आठशें मठ स्थापून व त्या मठांवर योग्य शिष्यांच्या नेमणुका करून सर्व देशभर श्रीरामाच्या भक्तीचा प्रसार केला, व लोकांचें लक्ष धर्माकडे लागेल, अशी तजवीज केली. श्रेष्ठांचे हातून इतकी मोठी कामागिरी झाली नाहीं, हें खरें आहे. पण तेही प्रपंचांत गढून जाऊन स्वस्थ बसले नव्हते. जें काम समर्थांनीं कृष्णेच्या कांठीं केलें, तेंच काम श्रेष्ठांनीं हळुहळू गंगेच्या कांठीं केलें. तेथील लोकांना श्रीरामाच्या भक्तीचें वळण त्यांनीं चांगलें लावलें. त्या प्रांतांत त्यांचा शिष्यवर्गही फार मोठा होता.

शिवळी प्रांताचे अधिकारी त्यांचे शिष्य होते. त्यांच्या घरीं लग्न निघालें. तेव्हां मुद्दाम जांबेस येऊन त्यांनीं श्रेष्ठांना लग्नाचें आमंत्रण दिलें. मुलांना घेऊन जावें, असें श्रेष्ठांनीं सांगितलें. पण, आपण आल्यावांचून लग्न व्हावयाचें नाहीं, असें त्यांचें आग्रहाचें बोलणें पाहून श्रेष्ठांनीं येण्याचें कबूल केलें.

त्याप्रमाणें ते लग्नाला गेले. लग्नाचा समारंभ आटोपला. तेव्हां ते सर्वांचा निरोप घेऊन परत फिरले. दुपारीं दहिंफळ नांवाच्या गांवीं त्यांचा मुक्काम झाला. तेथें उतरल्याबरोबर त्यांनीं सर्व बरोबरच्या मंडळीला सांगितलें कीं, "स्नानसंध्या करून भोजन लौकर आटपून घ्यावें." त्याप्रमाणें सर्वांचीं भोजनें झाल्यावर त्यांनीं सर्वांना हाक मारून भजनाला आरंभ केला, व रामचंद्रबावांस जवळ बोलावून सांगितलें कीं, "आम्ही आतां हा देह टाकून रघुपतीच्या पायांजवळ जाणार." तें ऐकून रामचंद्रबावा फार शोक करूं लागले. त्यांची पुष्कळ समजूत करून श्रेष्ठ म्हणाले, " आजपर्यंत आमच्या संगतींत वाढलां; त्याचें हेंच का फळ ? समर्थांचें छत्र तुमच्या डोकीवर आहे. त्यांच्या आज्ञेंत तुम्हीं राहावें. आपल्या कुळांत जी श्रीरामाची सेवा चालत आलेली आहे, तींत अंतर पाडूं नये. लोकांना भक्तीच्या मार्गाला लावण्याचें काम चालू ठेवावें. ही सगळी जबाबदारी आतां तुमच्यावर आहे." हा उपदेश ऐकून रामचंद्रबावांच्या मनाचें समाधान झालें. नंतर श्रेष्ठांनीं सर्वांचा निरोप घेतला; व 'राम' असें म्हणून त्यांनीं देह ठेविला (शके १५९९ ).

रामचंद्रबावांनीं पुढील विधि मोठ्या समारंभानें केला. झालेल्या हकीगतीचें पत्र जांबेस गेलें. तें पावतांच श्रेष्ठांची पत्नी व श्यामजीबावा हीं दोघें दहिंफळास आलीं. तेथें आल्यावर बाईनीं आकांत मांडला. सर्वांनीं अनेक प्रकारें तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. तिनें जिकडे पति गेले, तिकडे जाण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणें तिनेंही ' राम ' म्हटलें. दोघां पुत्रांनीं तिचा शेवटचा विधि केला. नंतर ते जांबेस आले.

त्या वेळीं रामचंद्रबावांचें वय १६ वर्षांचें, व श्यामजीबावा यांचें १० वर्षांचें होतें.

ही सगळी हकीगत समर्थांस समजली, तेव्हां त्यांनीं उद्धव गोसांवी यांस जांबेस पाठवून दोन्ही मुलांना आपल्याजवळ आणलें. त्यांना पाहून समर्थांना समाधान वाटलें. एक वर्षपर्यंत तीं मुलें तेथें राहिलीं. त्या मुदतींत त्यांचें आचरण पाहून समर्थांना फारच संतोष झाला. पुढें रामचंद्रबावांनीं म्हटलें, " आज्ञा असेल, तर आम्ही जांबेस जातों." तेव्हां समर्थांनीं त्यांना जाण्याला परवानगी दिली. दोघांनाही धर्माचा व भक्तीचा पुष्कळ उपदेश केला. व शेवटीं म्हणाले, " बाळांनो ! तुम्हीं श्रेष्ठांच्या कुळांत जन्म घेतला आहे. तेव्हां रघुपतीची सेवा करा. ती सोडूं नका, त्याचप्रमाणें लोकांत श्रीरामाची भक्ति वाढवा. मी धर्माचा जो उपदेश केला आहे, तो नीट ध्यानांत ठेवा व रघुपतीचे पाय केव्हांही विसरूं नका. **कुळाचें व्रत चालवून त्याची कीर्ति वाढविणें, निदान कायम ठेवणें, तिला जराही डाग लागेल, असें आचरण कधींही न करणें हाच मुलांचा धर्म होय.**" असा गोड उपदेश करून व उद्धव गोसांवी यांस बरोबर देऊन समर्थांनीं त्या मुलांची रवानगी केली.

---

## किती तरी गोड गळूं हें !

होतां होतां चांफळच्या मठांत शिष्यांचा बराच समुदाय झा-

ला. पंगतीला दोनशें पानें होऊं लागलीं. प्रत्येक शिष्य स्वामींच्या ठिकाणीं मोठी निष्ठा दाखवी; स्वामींच्या पायांचें तीर्थ घेतल्यावांचून अन्न तोंडांत घालावयाचें नाहीं, असा ज्याचा त्याचा नियम असे; तेव्हां या सगळ्यांची एकदां परीक्षा पहावी, असा विचार समर्थांनीं मनांत आणला.

त्याच दिवशीं उत्तम गोमांतकी आंबे महाराजांकडून आले होते. त्यांतला एक छानदारसा आंबा घेऊन समर्थांनीं आपल्या पायाच्या पोटरीला बांधला; त्यावर चांगलीं चारपांच वेष्टणें गुंडाळलीं; व मध्यरात्र झाल्यावर एकाएकीं ते विवळूं लागले. तेव्हां शिष्यमंडळी जवळ गोळा झाली. 'आपल्याला काय होतें आहे?' असें मोठ्या नम्रपणानें त्यांनीं समर्थांना विचारिलें. तेव्हां समर्थ म्हणाले, "बाबांनो! माझ्या पायाच्या पोटरीला एकाएकीं गळूं होऊन तें दोन प्रहरांत आंब्याएवढें झालें आहे. त्याला ठणका लागला असून त्या दुःखामुळें मी सारखा तळमळत आहें." 'याला उपाय काय?' असा मंडळीनें प्रश्न केला. त्यावर समर्थांनीं उत्तर केलें, "याला एकच उपाय आहे; पण तो सांगण्यांत अर्थ तरी काय? तुमचे हातून तो कसा होणार? जें दुःख आपल्या वांट्यास आलें, तें भोगलेंच पाहिजे; त्याप्रमाणें आम्ही भोगीत आहों. पुढें श्रीरामाची इच्छा असेल, तसें होईल." तेव्हां मंडळीनें विचारलें, "असा कोणचा अवघड उपाय तो? एकदां सांगावा. आमचे हातून होण्यासारखा असल्यास आम्ही करूं." समर्थ बोलले, "सांगून काय करावयाचें आहे? तुमच्या हातून तो कदापि होणार नाहीं." शिष्यांनीं फारच आग्रह केला, तेव्हां समर्थांनीं सांगितलें, "हें गळूं कोणीं तरी मनुष्यानें चोखून घे-

तलें पाहिजे. जो चोखून घेईल तो मरेल, व मी वांचेन." हें ऐकून सर्व शिष्य एकमेकांचे तोंडाकडे पहात राहिले.

आकाबाई, वेणूबाई व उद्धवगोसांवी यांनीं, हा काय प्रकार आहे, हें ओळखलें, व तीं स्वयंपाकाच्या गडबडीला लागलीं; तें पाहून इतर शिष्यमंडळी म्हणाली, " स्वामींच्या प्राणांवर संकट आलेलें असतांना यांना जेवण सुचतें तरी कसें ? यांची नजर केवळ पोटावर आहे. " याप्रमाणें सगळे बोलण्यांत मोठी कळकळ दाखवीत. पण समर्थांनीं सांगितल्याप्रमाणें गोष्ट करण्यास कोणीही पुढें येईना.

कल्याणगोसांवी आपल्या मातेच्या दर्शनाकरितां गांवीं गेले होते, ते इतक्यांत आले. तों सगळी मंडळी स्तब्ध बसली आहे, कोणी कोणाशीं बोलत नाहीं, स्नानसंध्या व देवपूजाही कोणीं केलेली नाहीं, हें पाहून ते गोंधळूनच गेले. तेव्हां त्यांनीं, काय झालें, याची चौकशी केली. मंडळीनें सर्व हकीगत त्यांना सांगितली. ती ऐकून कल्याणगोसांवी गडबडीनें समर्थांजवळ गेले, त्यांना साष्टांग नमस्कार घालून उभे राहिले, व नम्रपणानें म्हणाले, " महाराज! आपणांस कसली व्यथा झाली आहे?" समर्थांनीं म्हटलें, " आतां तूं आलास का? या सगळ्यांना माझें दुःख सांगितलें, त्याचा काय उपयोग झाला? तो आतां तुला सांगून होणार आहे!" यावर कल्याण म्हणाले," महाराज! आज आपल्या मनांत असें कां आलें बरें? मला आज्ञा तर झालीच पाहिजे." त्यानंतर समर्थांनीं त्यांना आपली सगळी हकीगत सांगितली. ती ऐकल्यावर कल्याण म्हणाले, " हात्तीच्या! यांत का अवघड आहे? महाराज! आपल्या देहापुढें माझ्या देहाची किंय

मत तीं काय? त्याच्यावरून हा देह ओंवाळून टाकावा." समर्थ बोलले, "म्हणजे? तूं हें चोखतोस कीं काय?" कल्याणांनीं उत्तर केलें, "हो! त्याला काय उशीर!" नंतर समर्थांनीं वरचीं वेष्टणें सोडलीं व फक्त बारीक वस्त्राचें पाहिलें वेष्टण तेवढें ठेवलें. व जेथें आंब्याचें तोंड होतें, तेथें हळूच बोट लावून म्हटलें,"या ठिकाणीं चोख. पण बाबा हळू हो! दुखवूं नको." कल्याण म्हणाले," महाराज! आपण अगदीं स्वस्थ असा. मी अगदीं हळूच चोखतों. आपल्याला जराही पीडा होऊं देत नाहीं." असें म्हणून तोंड लावून त्यांनीं चोखण्यास आरंभ केला. तों तो गोमांतकी आंबा अगदीं मधुर लागूं लागला. समर्थ म्हणाले, "कल्याणा! संभाळून. दुखेल बरें!" कल्याणांनीं उत्तर केलें, "अगदीं दुखवीत नाहीं महाराज! पण किती तरी गोड गळूं आहे हें! हें गळूं चोखून का मी मरणार ? महाराज अशीं आणखी बरींच गळवें आपणांस झालीं असतीं, तरी बरें होतें."असें त्यांनीं म्हणतांच समर्थ हासले. नंतर तो आंबा सोडून कल्याणगोसांवी यांनीं खाऊन टाकला. तेव्हां समर्थ सर्व शिष्यांस म्हणाले, "कल्याणानें केलें, तेंच तुम्हांलाही करितां आलें असतें. पण तुमची निष्ठाच तितकी. **बाबांनो! जिवाकडे पाहून खरें काम होत नाहीं.**" ते शब्द ऐकून सर्वांनीं लाजेनें खालीं माना घातल्या. नंतर सगळ्यांचीं स्नानें वगैरे होऊन भोजनें झालीं.

---

# शिवाजीमहाराजांचा मृत्यु.

श्रीरामाची पूर्ण कृपा ज्याच्यावर झाली, त्याच्या आंगीं वि-

लक्षण सामर्थ्य येतें. सामान्य माणसांच्या हातून ज्या गोष्टी कधींही व्हावयाच्या नाहींत, त्या गोष्टी तो अगदीं सहज करितो. सामान्य माणसाला जें दिसत नाहीं, तें त्याला दिसतें. सामान्य माणसाला जें कळत नाहीं, तें त्याला कळतें. पुढचें, मागचें, त्याला सर्व ज्ञान असतें. म्हणजे जे खरे साधु असतात, ते सर्वज्ञ (सर्व कांहीं जाणणारे ) व सर्वशक्तिमान ( वाटेल तें करण्याला समर्थ ) असतात.

समर्थ हे सर्वज्ञ होते, सर्वशक्तिमान होते. यामुळें पुढें होणाऱ्या सर्व गोष्टी त्यांना आधींच कळत असत. शिवाजीमहाराजांचा शेवट आतां बराच जवळ आला आहे, हें त्यांनीं जाणलें. व एके दिवशीं महाराज दर्शनाकरितां आले असतां ते म्हणाले, "शिवबा ! माझ्या मनांत आज तुला कांहीं सांगावयाचें आहे." तेव्हां महाराज हात जोडून म्हणाले, " काय ती आज्ञा व्हावी. आपली सेवा घडावी हीच दासाची इच्छा आहे." यावर समर्थ हासून बोलले, " शिवबा ! आतां राज्याच्या बंदोबस्ताला तूं लाग. सगळे सेवक व सरदार लोक यांचीं मनें एक होतील, अशी व्यवस्था कर. **राज्यांत जूट असेल, तरच तें टिकतें. फूट पडली कीं राज्याचा पाया तेव्हांच ढांसळतो.** म्हणून जे जे अधिकारी तूं नेमिले आहेस, त्यांनीं कांहीं झालें, तरी राज्याच्या सेवेंत अंतर करूं नये, असा होईल तेवढा बंदोबस्त कर. खजिन्यावर अगदीं विश्वासू माणसाची नेमणूक कर. तुरुंग, किल्ले, कोट यांच्यावर इमानी माणसें ठेव. तीं प्रसंगीं प्राण वेंचण्यास तयार असावीं. त्यांनीं कांहीं झालें, तरी फितूर होतां कामा नये. जे शत्रु जवळचे असतील, त्यांच्याशीं हरप्रयत्नानें सख्य जोड. जो बलाढ्य शत्रु असेल, त्याच्यावर

सर्वांचें लक्ष असावें. जो मनुष्य शूर, विश्वासू व निर्व्यसनी असेल, त्यालाच सेनेच्या अधिपतीची जागा द्यावी. शत्रु कोण व मित्र कोण, याचा नीट विचार करून त्याप्रमाणें प्रत्येकाशीं वागणूक असावी. पण तुझे उभयतां पुत्रांचा एकविचार करण्याची तजवीज पहिल्यानें पहा. कारण, **घरांतच फूट पडूं नये**. तूं सुज्ञ आहेस. तुला फार सांगण्याची जरूर नाहीं." हा स्वामींचा उपदेश ऐकून महाराज म्हणाले, "आपल्या आज्ञेप्रमाणेंच आजपर्यंत सर्व बंदोबस्त केला आहे. व आपला आशीर्वाद असेल, तर पुढेंही कल्याणच होईल."

नंतर समर्थ बोलले, "शिवबा! श्रीरामाच्या कृपेनें या राज्याची स्थापना व वाढ झाली आहे, व त्याची कृपा राहील, तर तें पुढें टिकून त्याची वाढही होईल. पण प्रयत्न माणसानें केला पाहिजे. तेवढा तूं आपलेकडून कर. श्रीरामचंद्राचें भक्तीनें पूजन करीत असावें. आजपर्यंत आम्हीं जो तुला धर्माचा उपदेश केला, त्याचें सारखें चिंतन करून तो मनावर दृढ करावा. हें सगळें तुझ्या ठिकाणीं आहेच. पण पुन्हा पुन्हा सांगणें हा आमचा धर्म आहे. म्हणून या वेळीं सुचविलें आहे." याप्रमाणें समर्थांचें बोलणें होतांच महाराजांनीं साष्टांग नमस्कार घातला व हात जोडून विनंती केली कीं, "स्वामी महाराज! आज अशी आज्ञा होण्याचें कारण आपल्या आशीर्वादानें माझ्या पूर्णपणें लक्षांत आलें आहे. आपल्या आज्ञेप्रमाणें मला जो कांहीं बंदोबस्त करितां येईल, तो मी आपलेकडून करितों. आपले चरण मीं हृदयांत सांठवून ठेविले आहेत. यास्तव सर्व प्रकारें कल्याण होईल, अशी माझी खातरी आहे."

समर्थांच्या तोंडून आज जे आपल्या कानीं शब्द पडले, ते बहुधा शेवटलेच आहेत, नाहीं तर असे शब्द त्यांच्या तोंडांतून निघालेच नसते, असें महाराजांनीं तेव्हांच ताडलें. समर्थ आपणास अखेरची निरवानिरव करून टाकण्याबद्दल ही सूचना देत आहेत, हें त्यांनीं मनांत ओळखलें. व मोठ्या भक्तीनें समर्थांच्या मूर्तीकडे ते पहात राहिले. तेव्हां समर्थ म्हणाले, "शिवबा ! आज तुझी अशी स्थिति कशानें झाली ?" हें ऐकून महाराजांनीं हंबरडा फोडला व समर्थांच्या पायांस मिठी घातली. आतां या चरणांना मी अंतरणार, असें मनांत येऊन त्यांना फार कष्ट होऊं लागले. महाराजांची झालेली ही स्थिति पाहून समर्थांनीं त्यांना पोटाशीं धरून म्हटलें, "शिवबा ! आजपर्यंत जो धर्माचा उपदेश तूं ऐकलास, त्याचें हेंच का फळ ?" महाराज म्हणाले, "याचें मला कांहीं उत्तर सुचत नाहीं." तेव्हां समर्थ म्हणाले, "आतां सगळे माझेपणाचे विचार टाकून दे. सांगितल्याप्रमाणें राज्याचा नीट बंदोबस्त कर. व रघुपतीच्या चरणीं सारखें लक्ष ठेव." 'आज्ञा' असें म्हणून महाराज समर्थांचा मोठ्या कष्टांनीं निरोप घेऊन रायगडास गेले.

रायगडास गेल्यावर समर्थांच्या आज्ञेप्रमाणें महाराजांनीं आपल्याकडून झाला तेवढा सगळा बंदोबस्त केला. एका गोष्टींतमात्र त्यांना हात टेंकावे लागले. दोघां पुत्रांचा एकविचार कांहीं केल्या होईना. म्हणून वडील पुत्र संभाजी याला त्यांनीं पन्हाळा किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेविलें. अशी सर्व व्यवस्था करून त्यांनीं संसाराकडचें लक्ष पूर्णपणें काढलें व रामचंद्राच्या चरणीं तें लावलें. दिवसभर देवाची पूजा-अर्चा व भजनचिंतन करण्यांत ते

काळ घालवूं लागले. तों आज आपला शेवट होणार, असें एक दिवस त्यांना वाटलें. म्हणून त्यांनीं सकाळींच स्नान करून देवाची, पादुकांची व ब्राह्मणांची भक्तीनें पूजा केली. नानाप्रकारचीं दानें ब्राह्मणांना दिलीं. व नंतर ते पुराण ऐकण्यास बसले, पुराण ऐकतां ऐकतांच रामनामाचा उच्चार करून त्यांनीं प्राण सोडला. ही गोष्ट शके १६०२, चैत्र शुद्ध १५, रविवार, या दिवशीं दोन प्रहरीं घडली. त्या वेळीं महाराजांचें वय ५३ वर्षांचें होतें.

या वेळीं सगळ्यांना जें दुःख झालें, त्याचें वर्णनच करितां यावयाचें नाहीं. सर्व महाराष्ट्रभर ही बातमी हां हां म्हणतां पसरली. ती ऐकतांच सर्व देश दुःखांत बुडाला. जासुदाच्या तोंडून समर्थांनीं जेव्हां हें वर्तमान ऐकलें, तेव्हां, “ माझा शिवबा गेला ना ! श्रींची इच्छा ! ” इतकेच शब्द बोलून ते एकदम खोलींत गेले.

---

# संस्थानची व्यवस्था.

यानंतर समर्थांनीं बाहेर फिरणें सोडून दिलें, व ते परळीसच राहूं लागले. त्यांनीं अन्न अगदीं टाकलें व ते नुसत्या दुधावर राहूं लागले. आपल्या खोलींत मग ते कोणालाही येऊं देत नसत. ज्याला ते बोलावीत त्यानेंमात्र जावें व काय सांगतील तें करावें, असा क्रम सुरू झाला. आकाबाई व उद्धवगोसांवी हींमात्र खोलींत न विचारतां जात व समर्थांस उठवून दूध घेण्याबद्दल आग्रह करीत. कल्याणस्वामी तेथें नव्हतेच. त्यांची नेमणूक डोम-

गांवच्या मठावर झाल्यामुळें ते तेथें राहात. वेणूबाई पूर्वींच निर्वतल्या होत्या. मिळून आवडत्या शिष्यांपैकीं उद्धव गोसांवी व आकाबाई हीं दोघेंच या वेळीं जवळ होतीं. असो. समर्थ दूधही नियमानें घेत नसत. कधीं घेत, कधीं नको म्हणून सांगत. अशी जरी खाण्यापिण्याची ते टाळाटाळ करीत, तरी दिवसें-दिवस त्यांचें शरीर पुष्ट व तेजस्वी दिसूं लागलें. यावरून ते लौकरच आतां आपल्या अवताराची समाप्ति करणार, हें आका-व उद्धवगोसांवी यांनीं जाणलें. व त्यांनीं समर्थांना विनंती केली कीं, " महाराज ! आपण आपल्या हातांनीं या संस्थानचा काय तो बंदोबस्त करावा. शिवाजीमहाराजांनीं अनेक गांवें या संस्थानाकडे लावून दिलीं आहेत. दुसऱ्याही वेळोवेळीं अनेक वसुलाच्या नेमणुका करून दिल्या आहेत. त्या सगळ्याची नीट व्यवस्था पुढें झाली पाहिजे. सर्वांचे मानपान ठरले पाहिजेत. पूजा, नैवेद्य व उत्सव यांची व्यवस्था नीट चालू राहिली पाहिजे. मागून कटकटी उत्पन्न होतील. व भांडणांत सगळ्या संस्थानचा नाश होईल. म्हणून सर्वांनीं कोणा तरी एकाचे आज्ञेप्रमाणें चा-लावें, असें करून दिलें पाहिजे."

अशी विनंती आकांनीं वारंवार करावी, पण समर्थांनीं ति-कडे मुळींच लक्ष देऊं नये, असें होऊं लागलें. शेवटीं एक दिवस समर्थांनीं अशी आज्ञा केली कीं, "जांबेस श्रेष्ठांचीं मुलें आहेत, त्यांना येथें आणावें, व हें संस्थान त्यांचे स्वाधीन करावें. तुम्हीं सगळ्यांनीं त्यांच्या आज्ञेंत वागावें. श्रीरामाची सेवा व भजन-पूजन करीत रहावें." त्याप्रमाणें जांबेस जाऊन मुलांना घेऊन ये-ण्याबद्दल आकांनीं तिघां शिष्यांना सांगितलें. पण तिकडे कांहीं

दंगे चालू असल्यामुळें सध्यां जाण्याची सोय नव्हती. तें समर्थांना कळलें, तेव्हां ते म्हणाले, "सांप्रत त्यांचें येणें होईल, असें दिसत नाहीं. असो. त्यांस आणण्याची पुढें तजवीज करून त्यांच्या आज्ञेनें सर्वांनीं चालावें. श्रींच्या उत्सवाची, पूजेची वगैरे सर्व व्यवस्था अशीच पुढें चालू राहावी."

## संभाजीनें गुण उधळले !

याच सुमारास संभाजीमहाराज समर्थांचें दर्शन घेण्याच्या हेतूनें किल्ल्याखालीं आले, व मी दर्शनास येत आहें, म्हणून त्यांनीं वर सांगून पाठविलें. तेव्हां समर्थांनीं उलट निरोप पाठविला कीं, "आम्हांला तूर्त बरें वाटत नाहीं. म्हणून दर्शन घडावयाचें नाहीं; सबब आपण येणें करूं नये." तें ऐकून संभाजीमहाराज परत साताऱ्यास गेले. तेथें गेल्यावर त्यांनीं फारच क्रूर कृत्यें केलीं. शिवाजीमहाराजांच्या जुन्या कारभाऱ्यांस व अनेक विश्वासू व इमानी नोकरांस हालहाल करून ठार मारविलें. कोणाला हत्तीच्या पायांखालीं घालून मार, कोणाला चुन्याच्या भट्टींत घालून भाजून टाक, असा सपाटा त्यांनीं सुरू केला. कलुशा नांवाच्या एका मूर्ख, व्यसनी व दुष्ट माणसाला त्यांनीं आपला कारभारी केला, व त्याच्या संगतीनें दारूच्या वगैरे व्यसनांत ते चूर होऊन गेले.

ही सगळी हकीगत जातां जातां समर्थांच्या कानांवर गेली. ती ऐकून त्यांना आश्चर्य वाटलें व फार दुःखही झालें. ते म्हणा-

ले, "माझ्या शिवबाच्या पोटीं असा पुत्र निपजावा अं ! दैवाची गति विचित्र खरी !" तेव्हां सर्वत्रांनीं समर्थांना विनंती केली कीं, "संभाजीला पत्र पाठवून कांहीं तरी उपदेश करावा. म्हणजे तो ताळ्यावर येईल." यावर समर्थ बोलले, "ईश्वराची इच्छा विपरीत दिसते. त्यांत क्षयमास आला आहे. तेव्हां राज्याची उलटापालट होणारच. त्याला काय उपाय !" पण पुन्हा सर्वांनीं फार आग्रह केला. तेव्हां त्यांनीं संभाजीमहाराजांना पत्र लिहिलें व तें एका माणसाबरोबर त्यांच्याकडे पाठवून दिलें. तें पत्र वाचून त्यांना मोठा संतोष झाला. व पत्र घेऊन येणारास त्यांनीं वस्त्रें, जवाहीर वगैरे देऊन त्याचा मोठा सन्मान केला. व 'आज्ञेप्रमाणें करतों,' असा जबाब त्याच्याबरोबर पाठविला.

---

## समर्थांचें पत्र.

समर्थांनीं संभाजीमहाराजांना जें पत्र लिहिलें, त्यांत उत्तम उपदेश भरलेला आहे. त्यांतल्या कांहीं निवडक ओंव्या येथें दिल्यावांचून राहवत नाहीं. त्या अगदीं सोप्या आहेत. त्यांचा अर्थ सहज लक्षांत येणारा आहे. असो. पत्रांतील निवडक ओंव्याः—

**श्रेष्ठीं जें जें मेळाविलें । त्यासाठीं भांडत बसलें ।**<br>
**तरी मग जाणावें फावलें । गलीमांशीं ॥ १ ॥**<br>
**ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्याशि जाये ।**<br>
**धीर धरून महत्कार्य । समजून करावें ॥ २ ॥**

---

१ शत्रु ( येथें मुसलमान. )

सकळ लोक एक करावे । गलीम निवटून[2] काढावे ।
येणें कीर्ति धावे । दिगंतरीं[3] ॥ ३ ॥
बहुत लोक मिळवावे । एकविचारें भरावे ।
कष्ट करोनि घसरावें । म्लेंच्छांवरी ॥ ४ ॥
आहे तितकें जतन करावें । पुढें आणिक मिळवावें ।
महाराष्ट्रराज्य करावें । जिकडे तिकडे ॥ ५ ॥
शिवराजास आठवावें । जीवित्वें[4] तृणवत मानावें ।
इहलोकीं परलोकीं तरावें । कीर्तिरूपें ॥ ६ ॥
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा साक्षेप[5] ।
शिवराजाचा आठवावा प्रताप । भूमंडळीं ॥ ७ ॥
सकल सुखाचा करावा त्याग । करूनि साधिजे तो योग[6] ।
राज्यसाधनाची लगबग[7] । कैसी केली ॥ ८ ॥
त्याहून करावें विशेष । तरीच म्हणवावें पुरुष ।
याउपरी आतां विशेष । काय लिहावें ॥ ९ ॥

---

# मूर्तीची स्थापना.

पूर्वीं समर्थांची स्वारी फिरत फिरत कर्नाटकांत गेली होती. तेव्हां शिवाजीमहाराजांचे सावत्रभाऊ व्यंकोजी राजे हे तंजावरास राज्य संभाळून होते, त्यांची गांठ त्यांनीं घेतली. त्या वेळीं श्रीरामपंचा-

---

२ निपटून—नाश करून टाकावे. ३ सर्व दिशांना, जिकडे तिकडे. ४ जीव, प्राण. ५ उद्योग. ६ युक्ति, चातुर्य; जिव्हाळा, कळकळ; आंच. ८ तांतड, गर्दी.

यतनाच्या चार मूर्ति मोठमोठ्या कराव्या,असें समर्थांच्या मनांत आलें. त्याप्रमाणें उत्तम कारागीर पाहून त्याजकडून मूर्ति करवाव्या,अशी व्यंकोजीराजांना आज्ञा झाली. पुढें त्यांनीं एक कारागीर आणला. मेणाच्या मूर्ति समर्थांनीं स्वतां तयार केल्या. व याप्रमाणें मूर्ति उतरल्या पाहिजेत, असें त्या कारागिरास सांगितलें. अगदीं तशा मूर्ति करून देतों, असें कारागिरानें कबूल केलें. त्या मूर्ति तयार होऊन याच सुमारास आल्या. त्या चारही मूर्ति पंचधातूंच्या होत्या.

आपण दिलेल्या नमुन्याप्रमाणें त्या अगदीं बरोबर आहेत, असें पाहून समर्थांना मोठा संतोष झाला. ज्या खोलींत ते निजत असत, त्याच खोलींत सिंहासन करून त्यावर मूर्तींची स्थापना त्यांनीं करविली. नंतर शास्त्राप्रमाणें त्यांची अर्चाही झाली. तेव्हांपासून मूर्तींच्यासमोर पलंगावर समर्थ नेहमीं बसलेले असत.

---

# अवताराची समाप्ति.

एके दिवशीं समर्थांनीं आकाबाईंना जवळ बोलावून म्हटलें, "या मूर्तींची शास्त्राप्रमाणें अर्चा होऊन सांप्रत त्यांची नित्य पूजा होत असतेच. पुढें या मुर्तींची व चांफळास ज्या श्रींच्या मूर्ति आहेत, त्यांची नित्य पूजा वगैरे करून भक्तिमार्ग चालवावा व संस्थान संभाळावें." "आपल्या आज्ञेप्रमाणें संस्थानची व

पूजेची वगैरे सर्व व्यवस्था होईल. काळजी नसावी." असें आकांनीं उत्तर दिलें.

दुसऱ्या दिवशीं समर्थ सकाळीं फार लवकर उठले, मुर्तींना साष्टांग नमस्कार त्यांनीं घातला व पायांत पादुका घालून मूर्तीच्यासमोर जमिनीवर ते बसले. त्या वेळीं खोलींत आका व उद्धवगोसांवी हींमात्र होतीं. इतक्यांत बरीच मंडळी बाहेर दर्शनाकरितां येऊन उभी राहिली. तेव्हां त्यांना आंत येण्याची आज्ञा असावी, अशी आकांनीं प्रार्थना केली. समर्थांनीं येऊं द्या, असें म्हटलें. ती मंडळी आली. सांष्टांग नमस्कार घालून साखर व मनुका त्यांनीं स्वामींपुढें ठेविल्या, व प्रार्थना केली कीं, आज नऊ दिवसांत समर्थांनीं तोंडांत पाणीहि घातलें नाहीं. तेव्हां कृपा करून थोडें साखरपाणी घ्यावें. ठीक आहे, असें समर्थांनीं उत्तर दिलें. मग आकांनीं वाटीभर पाणी करून पुढें केलें. तें समर्थ प्याले. मग सर्वांनीं बाहेर बसावें, अशी आज्ञा झाली. तीप्रमाणें सर्व मंडळी बाहेर गेली; आका व उद्धवगोसांवी हींमात्र आंत होतीं.

'महाराज ! पलंगावर बसावें,' अशी त्यांनीं प्रार्थना केली. तेव्हां समर्थ बोलले, "आमच्यानें उठवत नाहीं. तुम्हीच उठवा." त्या वेळीं दोघांनीं त्यांना उचलण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. पुढें चौघांनीं प्रयत्न केला. तरी फुकट. तेव्हां आकांनीं प्रार्थना केली कीं, 'स्वामी ! आपण उचलत नाहीं, हें काय ?' यावर स्वामींनीं उत्तर केलें कीं, 'तुम्ही सर्व एकीकडे व्हा.' असें म्हणतांच सर्व बाजूला झालीं. तेव्हां समर्थांनीं रघुपतीकडे पाहून सारखें ध्यान धरलें. तें पाहून आका वगैरे मंडळीला फार वाईट वाटलें.

तेव्हां समर्थ म्हणाले, " आजपर्यंत माझ्या सहवासाला राहून जें कांहीं श्रवण केलें, तें फुकट गेलें का? असें दुःख काय करितां?" यावर आकांनीं उत्तर केलें, " महाराज! आपल्या मूर्तीचें नित्य दर्शन होत असे, आपल्याशीं बोलणेंचालणें होत असे, तें सगळें आतां नाहींसें होणार, याबद्दल मनाला खेद होतो. दुसरें कांहीं नाहीं." तेव्हां समर्थ बोलले कीं, " दासबोध व आत्माराम हे दोन ग्रंथ पहावे, त्यांचीं पारायणें करावीं, म्हणजे आमच्याशीं प्रत्यक्ष संभाषण केल्याचें सुख प्राप्त होईल." असें बोलून समर्थांनीं 'हरहर' असा शब्द एकवीस वेळा उच्चारला, व 'श्रीराम' असें म्हणून मूर्तीकडे पाहिलें. त्याबरोबर त्यांच्या देहांतून प्राणांचें तेज बाहेर निघून गेलें व निर्जीव देह मागें राहिला. ही गोष्ट शके १६०३, माघ वद्य ९, शनवार, या दिवशीं दोनप्रहरीं घडली.

---

## दासनवमी.

नंतर आका व इतर मंडळी यांनीं पुष्कळ शोक केला. कांहीं वेळानें विचारानें तो आवरून सगळी मंडळी पुढील तजविजीस लागली. मठाचे उत्तरेस असलेल्या पटांगणांत एक जागा सर्वांच्या विचारानें पसंत होऊन त्या ठिकाणीं तुळशी व बेल यांच्या लांकडांनीं समर्थांच्या देहाचें दहन केलें. त्यांचें उत्तरकार्य उद्धव गोसांवी यांनीं केलें. त्या कार्याकरितां संभाजीमहाराजांकडून पैशाची चांगली मदत झाली.

ज्या ठिकाणीं दहन झालें, त्या ठिकाणीं शिष्यमंडळीनें समाधि बांधून तीवर लहानसें देऊळही उठविलें व त्यांत श्रीरामाच्या मूर्तीची स्थापना केली. पुढें संभाजीमहाराज व रामचंद्रपंत अमात्य हे एकदां समाधीच्या दर्शनास आले, तेव्हां तें देऊळ फार लहान आहे, असें पाहून तें मोठें बांधण्याबद्दल त्यांनीं हुकूम केला. त्याप्रमाणें समाधि व देऊळ हीं लागलींच पुन्हा चांगलीं बांधून झालीं. नंतर आकाबाई व इतर शिष्यमंडळी यांनीं संभाजीमहाराज व रामचंद्रपंत अमात्य यांस विनंती केली कीं, माघ वद्य प्रतिपदेपासून या ठिकाणीं दहा दिवस उत्सव सुरू व्हावा, त्यांत नवमीचा दिवस मुख्य असावा व दशमीला प्रातःकाळीं लळीत होऊन उत्सवाची समाप्ति व्हावी; व असा उत्सव दरवर्षी चालावा, अशी फार इच्छा आहे. संभाजीमहाराजांनाही तो विचार पसंत झाला. व त्यांनीं या पुण्यतिर्थाच्या उत्सवाकरितां नेमणूक करून दिली. तो उत्सव अद्यापपर्यंत चालू आहे. समर्थांनीं माघ वद्य ९ ला देह ठेविला. त्यामुळें त्या नवमीला ‘ दासनवमी ’ असें नांव मिळालें.

---

# पुढील हकीगत.

श्रेष्ठांचे पुत्र रामचंद्रबावा व श्यामजीबावा यांस चांफळास आणवून त्यांच्या स्वाधीन सर्व संस्थान करावें व त्यांच्या आज्ञेंत बाकीच्यांनीं राहावें, अशी समर्थांची आज्ञा झाली होती. पण

जांबेकडे दंगे चालू असल्यामुळें त्यांना आणतां आलें नाहीं. म्हणून दत्तोबागोसांवी व दिवाकरगोसांवी यांच्या विचारानें आकाबाई सर्व व्यवस्था पाहूं लागल्या. शिवाजीमहाराज यांनीं लावून दिलेल्या नेमणुका व इनामें चालू असल्यामुळें व त्यांनीं नेमलेल्या माणसांकडून वसुलाची वगैरे सर्व तजवीज होत असल्यामुळें संस्थानचा सगळा खर्च चांगला चाले. संभाजीमहाराजांकडूनही लागेल तशी पैशाची मदत होत असे. उद्धवगोसांवी इंदूरच्या मठावर असत. ते समर्थांच्या पुण्यतिथीला वर्षास परळीस येत. त्या वेळीं वर्षभर झालेल्या व्यवस्थेची चौकशी ते करीत. व कांहीं कमीजास्ती असल्यास ते सांगत.

याप्रमाणें व्यवस्था चालू असतां राज्यांत उलटापालट बरीच झाली. संभाजीमहाराजांचा बादशहानें क्रूरपणानें वध केला. राजाराममहाराज गादीवर बसले. त्याच संधीला संभाजीमहाराजांचा लहान पुत्र शाहू याला मुसलमानांनीं दिल्लीस नेऊन कैदेंत ठेविलें. राजाराममहाराज यांचाही अंत लौकरच झाला. पण त्यापूर्वीं शाहूमहाराजांची सुटका झाली होती. त्यामुळें राजाराममहाराजांचे मागून ते गादीवर बसले. नंतर ते एक दिवस समर्थांच्या समाधीचें दर्शन घेऊन परळीस श्रीरामाचें दर्शन घेण्याकरितां आले. तेथें आल्यावर आकाबाईनीं समर्थांचें सर्व चरित्र त्यांना सांगितलें. व त्या म्हणाल्या, “ रामचंद्रबावा व श्यामजीबावा हे दोघे श्रेष्ठांचे पुत्र जांबेस होते; त्यांस येथें आणवून त्यांच्या स्वाधीन हें सर्व संस्थान करावें, अशी समर्थांची आज्ञा होती. पण दंगेधोपे चालू असल्यामुळें त्यांना आणतां आलें नाहीं. म्हणून येथली व्यवस्था आम्हीं कशी तरी चालविलेली आहे. आतां ते

दोघेही श्रेष्ठांचे पुत्र वारले आहेत. पण रामचंद्रबावा यांना, गंगाधरगोसांवी व श्यामजीगोसांवी, असे दोन मुलगे आहेत. तेव्हां त्यांना येथें आणविण्याची तजवीज व्हावी." 'आज्ञेप्रमाणें करतों,' असें बोलून शाहूमहाराज परत गेले.

कबूल केल्याप्रमाणें त्या मुलांना त्यांनीं लौकरच आणविलें. नंतर चांफळास येऊन व गंगाधरगोसांवी, उद्धवगोसांवी व आकाबाई यांस साष्टांग नमस्कार घालून ते म्हणाले, "आज्ञेप्रमाणें गोसांवी यांस आणविलेंच आहे. आतां पुढें काय ती आज्ञा व्हावी." तेव्हां उद्धवगोसांवी बोलले, "मुलें अज्ञान आहेत. यास्तव संस्थानचा अभिमान आपणच बाळगावा." यावर महाराजांनीं उत्तर केलें, "सगळें राज्यच त्यांचें आहे. मी केवळ त्यांची सेवा करणारा आहें. आज्ञा होईल त्याप्रमाणें सेवा करीन." असें म्हणून खंडो बल्लाळ चिटणीस यांस आज्ञा केली कीं, "पूर्वीं संस्थानचा बंदोबस्त जसा होता, तसाच यापुढेंही चालवावा. कांहीं उणें पडल्यास तें सरकारांतून पूर्ण करावें." अशी ताकीद देऊन व दोनतीन दिवस तेथें मुक्काम करून महाराज परत साताऱ्यास गेले.

आकाबाई समर्थांच्या पाठीमागें ४० वर्षें होत्या. त्यांनीं २९ वर्षें संस्थानच्या कारभार चालविला. शके १६४३ सालीं त्यांनीं देह ठेविला. त्यांची सगळी उत्तरक्रिया गंगाधरबावा यांनीं उत्तम प्रकारें केली. उद्धवगोसांवी व कल्याणगोसांवी यांनीं आकांच्यापूर्वींच आपले देह ठेविले होते.

गंगाधरस्वामी यांना दोन बायका होत्या. पण पोटीं पुत्र नव्हता. ते साताऱ्यास सहज गेले असतां तेथेंच त्यांचा अंत झाला.

त्या वेळीं त्यांची धाकटी बायको गरोदर होती. म्हणून शाहू-महाराजांनीं श्यामजीगोसांवी यांस विनंती केली कीं, " धाकट्या बाई गरोदर आहेत. त्यांना पुत्र झाल्यास उत्तम. नाहीं झाल्यास आपले वडील पुत्र लक्ष्मणगोसांवी यांना गंगाधरबावांचे पुत्र मानून सगळा अधिकार द्यावा, असा माझा विचार आहे. " तेव्हां श्यामजीगोसांवी बोलले, " महाराज ! हें संस्थान आपलेंच आहे. आपल्या मनास येईल, तसें करावें. माझी कांहीं हरकत नाहीं. पुढें गंगाधरगोसांवी यांचे पत्नीस कन्याच झाली. नंतर महाराज शके १६५७ सालीं चांफळास उत्सवास आले; तेव्हां श्यामजीबावा यांचे वडील पुत्र लक्ष्मणगोसांवी यांस चांफळसंस्थानच्या गादीवर बसविलें. व त्यांस लक्ष्मण गंगाधर-गोसांवी असें नांव दिलें. त्या दिवसापासून लक्ष्मणस्वामी संस्थानचा व श्रींच्या सेवेचा सर्व अधिकार चालवूं लागले. ही चांफळची गादी आजपर्यंत याच कुळांतील पुरुषांकडे चालू आहे. व पूर्वींचे उत्सवही तसेच चालू आहेत. मात्र समर्थांच्या तेजाचा एकही पुरुष त्या गादीवर आला नाहीं. तें तेज ज्याचें त्याच्याबरोबर गेलें. देशांत कुठेच तेज राहिलें नाहीं. मग तें त्या कुळांत तरी कसें राहणार ?

---

# दासबोधाची थोरवी.

समर्थांनीं बरेच ग्रंथ केलेले आहेत. त्यांत ' दासबोध ' या नांवाचा एक ग्रंथ आहे. त्याची योग्यता फारच मोठी आहे. का-

रण, त्यांत सगळें कांहीं आहे. मनुष्यानें संसार चांगल्या रीतीनें करावा. उद्योग व पराक्रम करावा. सुख मिळवावें. कायमचें नांव मिळवावें. पण हें सगळें करितांना देवाला व आपल्या देशाला क्षणभरही विसरूं नये. म्हणजे त्याला या लोकीं सुख होतें; मेल्यानंतर परलोकीं सुख होतें. इतकें सगळें त्यानें केलें कीं, त्याचा जन्म सफळ होतो. मनुष्याचें हेंच कर्तव्य आहे. हें कर्तव्य उत्तम रीतीनें कसें करावें, हें ' दासबोध ' सांगतो. तें दुसरा कोणताही ग्रंथ तितकें चांगलें सांगत नाहीं. म्हणून ' दासबोध ' थोर.

समर्थ चाफळखोऱ्यांत आले, तेव्हां देशाची स्थिति फारच वाईट झाली होती. त्या स्थितीचें वर्णन मागें दिलें आहे. ती स्थिति नाहींशी करून लोकांना सुखी करावें, म्हणून समर्थांनीं जागजागीं मठांची स्थापना केली. त्या प्रत्येक मठावर उत्तम शिष्याची मठपति म्हणून नेमणूक केली. लोकांना शिक्षण देऊन चांगलें वळण लावण्याचें काम त्या मठपतीवर सोंपविलें. तें शिक्षण कशा प्रकारचें होतें, हेंच त्यांनीं दासबोधांत सांगितलें आहे. मठपतींनीं स्वतां कसें वागावें, व लोकांना कसें व कोणतें शिक्षण द्यावें, हें त्यांनीं दासबोधांत सांगितलें आहे. देशाची वाईट स्थिति झाली असतांना पुढें काय करावें, कोणत्या मार्गानें जावें, हें या सुंदर ग्रंथांत अगदीं स्पष्ट रीतीनें दाखविलें आहे.

मनुष्यानें आपलें घरदार व शेतवाडी यांची व्यवस्था केली, उद्योग किंवा व्यापारधंदा केला, पैसा मिळविला, आपलें कुटुंब व आपलीं मुलेंबाळें यांची नीट काळजी घेतली, व मिळेल तेवढें सुख आपण भोगलें व आपल्या मुलांबाळांना दिलें, म्हणजे त्याचें कर्तव्य संपत नाहीं. आपला संसार करितांना त्याला आपल्या

देशाच्या सुखदुःखाची काळजी वाहावी लागते. आपल्या संसाराप्रमाणेंच देशाच्या संसाराकडे त्याला लक्ष द्यावें लागतें. मनुष्य जर केवळ स्वतांच्या संसाराकडेच पाहील, देशाच्या सुखदुःखाचा जर तो मुळींच विचार करणार नाहीं, तर त्याचा स्वतांचा संसार सुखाचा व्हावयाचा नाहीं. सगळा देश सुखी असेल, तरच त्यांतील प्रत्येक माणसाचा संसार नीट चालून त्याला सुख होतें. देशाची स्थिति वाईट असेल, तर त्या देशांतील कोणाही माणसाला सुख व्हावयाचें नाहीं. म्हणून प्रत्येक माणसानें आपल्या संसाराकडे व राष्ट्राच्या किंवा देशाच्या संसाराकडे सारखेंच लक्ष दिलें पाहिजे. इतकेंच नव्हे, तर देशाचें हित पहिलें व आपल्या कुटुंबाचें हित दुसरें, असा क्रम असला पाहिजे. कारण, सगळ्या देशाचें हित झालें, म्हणजे त्यांतील प्रत्येक कुटुंबाचें हित आपोआप होतेंच. आपल्यापुरता संसार पशुही करितात. पण दुसऱ्याच्या सुखदुःखाचा त्यांना विचार करितां येत नाहीं. मनुष्याला ज्ञान असतें. त्या ज्ञानानें आपल्याप्रमाणेंच आपल्या देशांतील सगळ्या आपल्या बांधवांना सुख झालें पाहिजे, हें मनुष्याला समजतें;—निदान समजलें पाहिजे. आपल्याप्रमाणें इतर लोकांच्या सुखाची काळजी वाहणें यांतच मनुष्याचें थोरपण आहे. या थोरपणाची जाणीव समाजांत कशी उत्पन्न करावी, किंवा ही स्वतांच्या थोरपणाची ओळख लोकांना कशी करून द्यावी, हें समर्थांनीं दासबोधांत उत्तम रीतीनें दाखविलें आहे. आपल्या संसाराप्रमाणेंच राष्ट्राच्या किंवा देशाच्या संसाराकडे प्रत्येक माणसानें लक्ष दिलें पाहिजे. असें लक्ष देणें हें माणसाचें कर्तव्य आहे. या कर्तव्यालाच समर्थांनीं ‘महा-

राष्ट्रधर्म' असें सुंदर नांव दिलें आहे. या महाराष्ट्रधर्माचा लोकांत फैलाव करूनच समर्थांनीं स्वराज्य स्थापण्याला लोकांचीं मनें तयार केलीं. हल्लींच्या बोलण्यांत यालाच आपण ' देशाचा अभिमान ' असें म्हणतों.

दासबोधांत धर्माचा गोड उपदेश तर आहेच; पण त्या उपदेशाबरोबर आपला व आपल्या देशाचा संसार कसा करावा, याचाही फारच छान उपदेश आहे. हे दोन्ही प्रकारचे उपदेश ज्यांत आहेत, असा दुसरा कोणताही ग्रंथ नाहीं. नुसत्या धर्माचा, भक्तीचा किंवा परमेश्वराच्या ज्ञानाचा ज्यांत उपदेश केलेला आहे, असे साधु पुरुषांचे ग्रंथ पुष्कळ आहेत. पण हे दोन्ही प्रकारचे उपदेश ज्यांत एकत्र केलेले आहेत, असा ग्रंथ फक्त दासबोधच आहे. म्हणूनच दासबोधाची थोरवी विशेष आहे. या दासबोधांतील उपदेशाला किंवा शिक्षणाला समर्थांची ' शिकवण, ' किंवा दासबोधाची 'शिकवण' असें म्हणतात. या शिकवणीनें पूर्वीं महाराष्ट्राचें फारच कल्याण झालेलें आहे. महाराष्ट्राला स्वराज्याची जोड या शिकवणीमुळेंच झाली. मागें समर्थांचें जें चरित्र सांगितलें आहे, त्यावरून ती शिकवण शिवाजीमहाराजांना कशी उपयोगीं पडली, तीमुळें त्यांना मराठ्यांचें राज्य कसें स्थापतां आलें, हें कळण्यासारखें आहे. यावरून दासबोधाच्या शिकवणींत किती सामर्थ्य व तेज आहे, हें सहज लक्षांत येतें.

समर्थांच्या वेळीं देशाची फार वाईट स्थिति झाली होती. ती घालविण्याला दासबोधाची शिकवण फार उपयोगीं पडली. ती शिकवण जशी त्या काळीं उपयोगीं पडली, तशी ती कोण-

त्याही काळीं उपयोगीं पडणारी आहे. तिचा उपयोग फक्त त्या काळापुरता होता, असें कांहीं नाहीं. ज्या ज्या वेळीं देशाची किंवा समाजाची वाईट स्थिति होईल, त्या त्या वेळीं ही दासबोधाची शिकवण पुढील वाट दाखविल्यावांचून राहणार नाहीं. या ग्रंथानें पूर्वीं महाराष्ट्रांत जें तेज उत्पन्न केलें, तें तेज पुन्हा महाराष्ट्रांत उत्पन्न करण्याचें सामर्थ्य या ग्रंथांत आहे. आज आपल्या देशाची स्थिति सर्व बाजूंनीं अगदीं वाईट झाली आहे. आतां पुढें काय करावें, या विचारांत सगळे लोक पडले आहेत. नको हें जिणें, असें लोकांना होऊन गेलें आहे. दिवस फारच कठिण आले, कसा निभाव लागतो, असे काळजीचे शब्द जिकडे तिकडे ऐकूं येऊं लागले आहेत. ज्याचें त्याचें मन गोंधळून गेलें आहे. आजचा दिवस गेला, उद्यांचा कसा जातो, अशी चिंता लोकांना लागून राहिली आहे. अशा आजच्या बिकट स्थितींत 'दासबोध' महाराष्ट्राला मार्ग दाखविल्यावांचून राहणार नाहीं. त्याचा महाराष्ट्रानें अभ्यासमात्र केला पाहिजे. तो जर त्यानें केला नाहीं, तर महाराष्ट्राचे पदरीं मूर्खपणा येईल. घरीं कामधेनु असून एखादा मनुष्य जर उपाशीं मरूं लागला, तर तो मूर्खच ठरेल. आपण दासबोधाचा या वेळीं अभ्यास करून त्यांतील शिकवणीप्रमाणें जर वागलों नाहीं, तर तो दोष आपलाच आहे. म्हणून मुलांनो ! तुम्ही समर्थांच्या एकंदर चरित्राचा व त्यांच्या दासबोधाचा नीट अभ्यास करावा, हें फार चांगलें आहे. तसा अभ्यास केल्यानें तुमचें हित होईल, देशाचें हित होईल.

या ग्रंथांतील शिकवण सगळ्यांना उपयोगीं पडणारी आहे.

मनुष्य लहान असो, थोर असो; राजा असो, रंक असो; संसारी असो, बैरागी किंवा संन्यासी असो; ब्राह्मण असो, शूद्र असो; व्यापारी असो, शेतकरी असो; कारखानदार असो, मजूर असो; धनी असो, नोकर असो; राजा असो, प्रजा असो; स्त्री असो, पुरुष असो; कोणीही असो, त्याला आपलें कर्तव्य नीट रीतीनें कसें बजावावें, हें दाखविणारा एक फक्त दासबोध आहे. कोणालाही कोणत्याही बाबतींत सल्ला किंवा मसलत पाहिजे असल्यास त्यानें दासबोधाकडे धांव घ्यावी. उत्तम मसलत त्याला मिळाल्यावांचून राहणार नाहीं. ज्याला उत्तम रीतीनें संसार करावयाचा असेल, त्यानें याचा अभ्यास करावा. ज्याला केवळ ईश्वराचा लाभ करून घेऊन जन्माचें चीज करावयाचें असेल, त्यानें याचीं पारायणें करावीं. ज्याला स्वराज्य स्थापावयाचें किंवा मिळवावयाचें असेल, त्यानें हा ग्रंथ वाचून त्याचें चिंतन करावें. मिळालेलें किंवा स्थापलेलें स्वराज्य ज्याला उत्तम रीतीनें चालवून टिकवावयाचें असेल, त्यानें यांतील उपदेशाप्रमाणें चालावें. तात्पर्य, आपल्याला पुन्हा चांगले दिवस यावे, असें जर महाराष्ट्राला वाटत असेल, तर त्यानें समर्थांच्या चरित्राचा नीट विचार करावा, त्यांनीं केलेली कामगिरी लक्षांत घ्यावी, दासबोधांत त्यांनीं दिलेल्या शिकवणीचा अभ्यास करावा, व त्यांनीं घालून दिलेल्या देशहिताच्या मार्गानें जावें. दुसरा उपाय नाहीं.

# दासबोधाची शिकवण.

दासबोधांत समर्थांची शिकवण आहे. ती शिकवण समजण्याकरितां सर्व दासबोध ग्रंथच वाचून त्याचा नीट अभ्यास केला पाहिजे. ती येथें थोडक्यांत सांगतां येणार नाहीं. पण,

**मराठा तितुका मेळवावा । आणि महाराष्ट्रधर्म वाढवावा ।**

असें समर्थांनीं म्हटलें आहे. हा महाराष्ट्रधर्म काय आहे, तें आपण पाहूं. हा धर्म पुढील एकाच ओंवींत समर्थांनीं सांगितला आहे:—

**मुख्य हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण ।**
**तिसरें तें सावधपण । सर्वविषयीं ॥ १ ॥**

महाराष्ट्रधर्माच्या प्रसारानें सर्व मराठ्यांची एकी करावी, असें सांगून या ओंवींत समर्थांनीं महाराष्ट्रधर्म म्हणजे काय तें सांगितलें आहे. **या धर्माचें पहिलें अंग ' हरिकथानिरूपण ' हें आहे.** हरिकथानिरूपण याचा अर्थ श्रीहरीच्या किंवा परमेश्वराच्या भक्तीचा छंद. सगळ्या लोकांना परमेश्वराच्या भजनीं पहिल्यानें लावावें, अशी मठपतींना समर्थांची आज्ञा होती. परमेश्वर भक्तीनें वश होतो. तो वश झाला, म्हणजे भक्तांचीं सर्व संकटें दूर करतो. तो सर्वसमर्थ आहे. त्याची कृपा असली, म्हणजे त्या कृपेच्या बळावर मनुष्याला वाटेल तें सहज करितां येतें. स्वतां मनुष्याचें सामर्थ्य अल्प आहे. म्हणून त्याला कोणाचा तरी आधार लागतो. दुसऱ्या माणसाचा आधार मिळाला, तरी तो आधारही कच्चाच. **सर्व काळीं व सर्व स्थळीं पुरा उपयोगीं पडणारा**

**असा आधार काय तो एका परमेश्वराचाच.** तो आधार मिळाला, म्हणजे यश खातरीनें येतें. म्हणून समर्थांनीं महाराष्ट्र-धर्मांत देवाच्या भक्तीला पहिली जागा दिली आहे. **तेव्हां ज्याला देशाचें हित करावयाचें असेल, त्यानें स्वतां श्रीरामाची भक्ति केली पाहिजे, व मग त्या भक्तीचें वळण लोकांना लावलें पाहिजे.** कारण,

**आधीं केलें मग सांगितलें ।**

असें समर्थांचें म्हणणें आहे. स्वतां कांहीं न करितां लोकांना कोरडा उपदेश केला, तर त्याचा लोकांच्या मनांवर कांहीं परिणाम होत नाहीं. उपड्या घांगरीवर पाणी ओतल्याप्रमाणें त्यांचा उपदेश व्यर्थ होतो. हें जाणून समर्थांनीं निरनिराळ्या मठांवर जे शिष्य नेमिले होते, ते उत्तम भक्त होते. आणि म्हणूनच त्यांच्या उपदेशाचा परिणाम लोकांच्या मनांवर झाला. समर्थांचे जसे मठपति तसेच हल्लींचे आपले पुढारी आहेत. आपण पुढें होऊन सगळ्या लोकांना हिताच्या मार्गाकडे नेतात, ते पुढारी होत. पण या पुढाऱ्यांच्या अंगीं स्वतां सामर्थ्य पाहिजे. तें नसेल, तर त्यांच्यामागून कोणी जाणार नाहीं. आपल्या पुढाऱ्यांनीं हें भक्तीचें अंग अगदीं गाळलें आहे. त्यांनीं त्या भक्तीची किंमत ओळखली नाहीं. त्यामुळें ते स्वतां भक्ति करीत नाहींत, लोकांना तिचा उपदेश करीत नाहींत. त्यांना भक्तिच निरुपयोगी जर वाटते, तर ते तिचा लोकांना उपदेश करीत नाहींत, हें योग्यच आहे. पण येथें त्यांची चूक होत आहे. समर्थांना देशहित करण्यांत जें यश आलें, त्याचें कारण श्रीरामाची कृपा. ती कृपा मिळविण्याकरितां त्यांनीं दोन तपें म्हणजे चोवीस वर्षें आपला देह चंदना-

प्रमाणें झिजविला. हें आपण त्यांच्या चरित्रांत पाहिलेंच आहे. **आपल्या सर्व चळवळी हल्लीं फोल होतात, याचें कारण त्या चळवळींना भगवंताचें अधिष्ठान ( आधार ) नसतें.** म्हणून महाराष्ट्रधर्माच्या या पहिल्या अंगाकडे पुढाऱ्यांनीं व सर्वांनीं पहिल्यानें लक्ष दिलें पाहिजे. तें जोंपर्यंत दिलें नाहीं, तोंपर्यंत कोणतीही चळवळ सफळ व्हावयाची नाहीं. **समर्थांच्या सगळ्या शिकवणीचा पाया देवाची भक्ति,** हा आहे. तिकडे सध्यां आपलें लक्ष जाणें फार अगत्याचें आहे. पाया भक्कम नसला, तर उठाविलली इमारत टिकत नाहीं. ती लागलीच ढांसळून पडते. आपल्या सगळ्या चळवळी हल्लीं अशाच पडत आहेत. बुडबुड्याप्रमाणें क्षणांत त्यांचें आयुष्य संपतें. समर्थांच्या महाराष्ट्रधर्मांचा विचार केला, म्हणजे असें होण्याचें कारण तेव्हांच लक्षांत येतें. तात्पर्य, महाराष्ट्रधर्मांचें पहिलें अंग जें ‘ **हरिकथानिरूपण** ’ त्याकडे आपण विशेष लक्ष ठेविलें पाहिजे.

‘ **राजकारण** ’ **हें महाराष्ट्रधर्माचें दुसरें अंग आहे.** राज्याच्या व्यवस्थेसंबंधाच्या ज्या गोष्टी त्यांना राजकारण म्हणतात. प्रत्येक संसारी माणसानें या राजकारणांत लक्ष घातलें पाहिजे. आपल्या राज्याचा कारभार कसा चालला आहे, इकडे प्रत्येकानें पाहिलें पाहिजे. कारण राज्याचा कारभार चांगला चालला असेल, तरच लोकांना सुख होतें. राजा हा प्रजेकरितां असतो. प्रजेला सुख होईल, अशीच त्यानें राज्यांत व्यवस्था ठेविली पाहिजे. तो तशी व्यवस्था ठेवतो आहे किंवा नाहीं, हें प्रत्येक प्रपंची किंवा संसारी माणसानें पाहिलें पाहिजे. **राजानें केलेल्या व्यवस्थेपासून जर लोकांना दुःख होत असेल, तर सर्वांनीं**

**जुटीनें प्रयत्न करून तें दुःख दूर करण्याला राजाला भाग पाडलें पाहिजे.** प्रजेनें एकमतानें जर चळवळ केली, तर राजाला प्रजेचें म्हणणें ऐकावेंच लागतें. कारण प्रजा संतुष्ट असल्यावांचून राजालाही सुख होत नाहीं. व त्याचें राज्य टिकत नाहीं. हें जाणून चांगला राजा प्रजेचें म्हणणें ऐकतो. व तिचीं दुःखें दूर करतो. पण प्रजा जर राज्यकारभारांत लक्ष घालणार नाहीं, तर राजा जुलमी होतो. राजालाही प्रजेचा धाक असावा लागतो. आपण जुलूम केला, तर तो जुलूम प्रजा सहन करणार नाहीं, अशी दहशत राजाच्या मनांत नेहमीं वागत असली पाहिजे. तरच तो आपला कारभार उत्तम ठेवील व प्रजेला सुखी करील; पण असा प्रजेचा धाक उगीच बसणार नाहीं. प्रजेचें आपल्या कारभाराकडे लक्ष आहे, असें राजाला नेहमीं वाटलें पाहिजे. व प्रजेंत जूट असली पाहिजे. तरच तिचा धाक राजाला वाटेल. म्हणून सगळ्या लोकांनीं राजकारणांत लक्ष घालावें, असें समर्थांचें सांगणें आहे. व हें राजकारणाचें शिक्षण लोकांना द्यावें, अशी त्यांनीं मठपतींना आज्ञा केली होती. राजकारणांत लक्ष घालणें, याचा अर्थ राष्ट्राची किंवा देशाची भक्ति करणें असाच होतो. तेव्हां लोकांना पहिल्यानें देवाच्या किंवा धर्माच्या भक्तीचें वळण लावणें व नंतर देशाच्या भक्तीचें वळण लावणें, ही कामगिरी समर्थांनीं मठपतींवर सोंपविली होती. **'प्रपंचीं जाणे राजकारण,'** असें समर्थांचें वचन आहे. त्याचा अर्थ, राजकारण हा प्रपंचाचाच किंवा संसाराचाच एक भाग आहे, असा होतो. राजकारणाचा भाग गाळून जर प्रपंच कोणी करील, तर त्याचा तो प्रपंच सुखाचा होणार नाहीं. असा समर्थांचा सिद्धान्त आहे.

म्हणून लोकांच्या पुढाऱ्यांनीं लोकांना प्रथम देवाच्या, मग राष्ट्राच्या किंवा देशाच्या भजनीं लावण्याचा उद्योग केला पाहिजे, अशी समर्थांची शिकवण आहे.

'**सर्वांविषयीं सावधपण**' हें **महाराष्ट्रधर्माचें तिसरें अंग** आहे. प्रत्येक गोष्ट सावधगिरानें करावी, प्रत्येक पाऊल विचारानें टाकावें, असा याचा अर्थ आहे. प्रसंग कोणता आहे, हें पुरें ओळखून जो युक्तीनें त्यांतून पार पडण्याचा प्रयत्न करितो, त्यालाच आलेलीं संकटें दूर करण्यांत यश येतें. एकच नियम सर्वकाळीं व सर्वस्थळीं उपयोगीं पडत नाहीं. जसा प्रसंग असेल, तसें वागावें लागतें. प्रसंग बदलला कीं, आपलें वर्तनही त्याप्रमाणें बदलून त्या प्रसंगांतून निभावलें पाहिजे. म्हणजे संसारांत किंवा राजकारणांत वागतांना मनुष्याच्या अंगीं युक्ति किंवा चातुर्य पाहिजे. यालाच नेहमींच्या बोलण्यांत 'मुत्सद्दीपणा' म्हणतात.

तात्पर्य, **ईश्वरभक्ति, राष्ट्रभक्ति व मुत्सद्दीपणा हीं महाराष्ट्रधर्मोचीं तीन अंगें आहेत.** हाच काय तो महाराष्ट्रधर्म. याचाच प्रसार समर्थांनीं मठपतींकडून लोकांत करविला व स्वराज्याची तयारी केली.

---

हा महाराष्ट्रधर्म लोकांना शिकविण्याचें काम ज्याला आंगावर घ्यावयाचें असेल, त्याच्या ठिकाणीं वर सांगितलेले तिन्ही गुण पूर्णपणें असले पाहिजेत. तो ईश्वरभक्त असला पाहिजे, देशभक्त असला पाहिजे, तो मुत्सद्दी असला पाहिजे. पण एवढ्या-

नेंही काम होत नाहीं. त्याच्या अंगीं आणखी दोन गुण असले पाहिजेत. ते नसतील, तर त्याचा उपदेश व्यर्थ होईल. सगळ्या लोकांची एकी करणें हा जो महाराष्ट्रधर्माचा हेतु तो सफळ होणार नाहीं. ते गुण समर्थांनीं पुढील ओंवींत सांगितले आहेतः—

**जेणें बहुतांस घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ति ॥**
**बहुतांचें मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ॥ १ ॥**

सगळे लोक एकीनें देवाच्या व देशाच्या भजनीं लावण्याचें काम सफळ होण्याला मठपतीच्या किंवा पुढाऱ्याच्या अंगीं पहिला गुण '**प्रबोधशक्ति**' हा असला पाहिजे. '**प्रबोधशक्ति**' याचा अर्थ आपल्या वाणीनें लोकांच्या मनांवर परिणाम करण्याची किंवा ठसा उमटविण्याची शक्ति, असा आहे. उपदेश करणाराच्या वाणींत तेज पाहिजे, एक प्रकारची जादू पाहिजे. ही जादू किंवा तेज जर नसेल, तर त्याच्या उपदेशाचा ठसा लोकांच्या मनांवर उमटणार नाहीं. ते उपदेश एका कानानें ऐकतील व दुसऱ्या कानानें सोडून देतील. 'नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडे गेलें वारें' अशी अवस्था होईल. तशी झाली, तर उपदेशाचा काय उपयोग? उपदेश पक्का ठसला पाहिजे. त्या उपदेशाप्रमाणें निश्चयानें वागण्याला लोकांची तयारी झाली पाहिजे. तो उपदेश आचरणांत आणण्याबद्दल लोकांना तळमळ लागली पाहिजे. तरच उपदेशाचें सार्थक. प्रबोधशक्ति असल्यावांचून हें व्हावयाचें नाहीं.

पुढाऱ्याच्या, किंवा उपदेश करणाऱ्याच्या अंगीं ही प्रबोधशक्ति केव्हां येते? उपदेश करणाराची किंवा पुढाऱ्याची वागणूक त्याच्या बोलण्याप्रमाणें असते तेव्हां. तो जर स्वतां उपदेशा-

प्रमाणें वागत नसेल, तर त्याच्या उपदेशाचा किंवा व्याख्यानाचा ठसा लोकांच्या मनांवर उठावयाचा नाहीं. ‘ लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडा पाषाण ’ असा जर पुढारी किंवा उपदेश करणारा असेल, तर त्याचें ऐकणार कोण ? व त्याप्रमाणें वागणार कोण ? आडांतच नाहीं, तें पोहऱ्यांत कोठून येणार ? ‘ जाळावांचून कढ नाहीं, व मायेवांचून रड नाहीं ’ या म्हणीचा अर्थ तोच आहे. विस्तवावांचून पाण्याला कढ येत नाहीं; खरी माया पोटांत असल्यावांचून खरें रडें येत नाहीं. त्याप्रमाणें बोलणाराचें आचरण शुद्ध असल्यावांचून त्याच्या बोलण्याचा परिणाम ऐकणारावर होत नाहीं. समर्थांचीं वचनें पहाः—

**( १ ) वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥**

**( २ ) क्रियेविण शब्दज्ञान । तेंचि श्वानाचें वमन ।**
**भले तेथें अवलोकन । कदापि न करिती ॥ १ ॥**

**अर्थः**—स्वतांची वागणूक बोलल्याप्रमाणें जो ठेवीत नाहीं, त्याचें बोलणें कुत्र्याच्या ओकारीप्रमाणें होय. चांगले लोक तिकडे ढुंकूनही बघत नाहींत. म्हणून, ‘ **जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ।** ’ म्हणजे प्रबोधशक्ति अंगीं येते. वाणींत तेज येतें, जादू येते.

---

‘ **बहुतांचें मनोगत हातीं घेतलें पाहिजे.** ’ हा दुसरा गुण उपदेश करणाराच्या किंवा पुढाऱ्याच्या अंगीं असला पाहिजे. ‘ बहुतांचें मनोगत हातीं घेणें, ’ याचा अर्थ लोकांचीं मनें आप-

लोंशीं करणें. हें सामर्थ्य पुढाऱ्याच्या किंवा मठपतीच्या अंगीं असलें पाहिजे. ज्याला लोकांचें कल्याण करावयाचें असेल, त्यानें लोकांचीं मनें संभाळलीं पाहिजेत. तीं दुखवितां कामा नये. त्यांच्यांत मिळूनमिसळून गोडीगुलाबीनें वागलें पाहिजे. आपले हेतु त्यांना कळवून त्यांचीं मनें युक्तीनें वळविलीं पाहिजेत. तरच काम होईल; नाहीं तर लोक त्याच्या वाऱ्यासही उभे राहणार नाहींत. लोकांशीं तुडसपणानें जो वागेल, त्याच्याशीं लोकही तुडसपणानें वागतील. मग एकी होणार कशी ? व लोकांचें कल्याण होणार कसें ? याविषयीं समर्थांचीं वचनें पहा:—

( १ ) **मुलाच्या चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ।**
**तैसें जनास शिकवावें । हळूहळू ॥ १ ॥**

( २ ) **अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करूं नका ॥**

( ३ ) **लोक राजी राखोन कीजे । सकळ कांहीं ॥**

तात्पर्य, लोकांना दुखवून आपलें काम होणार नाहीं, हें लक्षांत असावें. लोकांना राजी राखून आपलें काम केलें, तरच पुढाऱ्यांचे हेतु सफळ होतील, हें लक्षांत ठेवून त्यांनीं वागावें. लोक अडाणी, त्यांच्यांत आपण मिसळावें कसें, असा तांठा पुढाऱ्यांत असेल, तर लोक त्याला आपला पुढारी म्हणून मानणार नाहींत. मग तो लोकांना शिक्षण देणार कसा ? व देवाच्या किंवा देशाच्या भक्तीला लावणार कसा ? लोकांचें प्रेम आपल्यावर बसेल, अशी त्यांच्याशीं पुढाऱ्याची वागणूक पाहिजे.

---

आतांपर्यंत जें सांगितलें तेंच समर्थांच्या एकंदर शिकवणीचें मुख्य सार आहे. लोकांमध्यें देवभक्तीची व देशभक्तीची चळवळ करितांना स्वतां मठपतींनीं आपली वागणूक कशी ठेवावी, याविषयींही समर्थांनीं नियम घालून दिलेले होते. ज्यांना देशाच्या कल्याणाचें काम हातीं घ्यावयाचें असेल, त्यांना ते नियम मोठे उपयोगी आहेत. म्हणून ते नियम काय आहेत, याचा आपण विचार करूं.

‘ **येके स्थळीं राहों नये** । ’ किंवा ‘ **नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटण करावें** ।’ असें समर्थांचें पहिलें सांगणें आहे. ज्याला देवाच्या व देशाच्या भजनीं लोकांना लावण्याचें काम करावयाचें असेल, त्यानें एका जागीं कधीं बसूं नये. त्यानें सर्व देशभर परिभ्रमण किंवा फिरणें केलें पाहिजे. असें परिभ्रमण केल्यानें लोकांची स्थिति समक्ष पहातां येते. कोणत्या गांवीं कोण लोक कसे आहेत, याची माहिती होते. लबाड कोण, ढोंगी कोण, सच्चा कोण, लुच्चा कोण, इमानी कोण, देशावर खरी भक्ति करणारा कोण, देशाशीं दगलबाजी करणारा कोण, आपल्या फायद्याकरितां आपल्या देशांतील लोकांचे गळे कापणारा कोण, हें कळतें. ‘ **सावधपणें ज्याला त्याला । भेटी द्यावी** । ’ मोठ्या सावधगिरीनें प्रत्येक माणसाची भेट घ्यावी, असें समर्थ सांगतात. अशा भेटी घेऊन आपले हेतु प्रत्येकाला युक्तीनें कळवावे. पण त्यांत सावधपणा ठेवावा. म्हणजे कोण माणूस कसा आहे, हें पुरें ओळखल्यावांचून त्याला आपला बेत सांगूं नये. दगलबाज असेल, तर आपल्या कामाचा नाश होईल. म्हणून मनुष्य कसा आहे, याचा अनुभव येईपर्यंत त्याच्याशीं मोठ्या बेतानें वागावें.

**या कारणें मुख्य मुख्य । तयांसी करावें सख्य ।**
**येणें कारितां असंख्य । बाजारी मिळती ॥ १ ॥**

गांवांत जे कोणी मुख्य असतील, त्यांच्याशीं सख्य करावें. आपले सगळे हेतु त्यांना समजावून द्यावे. अशा रीतीनें ते आपल्या हेतूंना अनुकूळ झाले, म्हणजे त्यांच्या तंत्रानें चालणारे जे शेंकडों लोक असतात, ते आपोआप आपल्या बेताला अनुकूळ होतात. मग आपलें काम होण्याला उशीर लागत नाहीं.

**दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।**
**सज्जनापरीस आळवावे । महत्त्व देउनी ॥ १ ॥**

वाईट माणसें कोण आहेत, याची माहिती करून घ्यावी; पण त्यांच्याशीं वागतांना, आपण त्यांना ओळखतों, असें दाखवूं नये. चांगल्या माणसांपेक्षांही त्यांना अधिक मोठेपणा देऊन त्यांना गोंजारावें. अशा रीतीनें त्यांना सुधारण्याचा प्रयत्न करावा.

---o---

**कुग्रामें अथवा नगरें । पाहावीं घरांचीं घरें ।**
**भिक्षामिसें लहानथोरें । परीक्षून सोडावीं ॥ १ ॥**

खेडें असो कीं मोठें शहर असो, तेथें भिक्षेच्या निमित्तानें जावें, एकाही घरीं गेल्यावांचून राहूं नये, व लहानथोर सगळीं माणसें कशीं आहेत, याची मनांत परीक्षा करून ठेवावी, असें या ओंवींत समर्थ सांगतात. मठपतींनीं आपला निर्वाह भिक्षेवर करावा, अशी समर्थांची शिकवण होती. पण ती भिक्षा रोज एका गांवांत मागावयाची नसे. रोज नव्या गांवीं भिक्षेला जावें, अ-

शी समर्थांची आज्ञा होती. कारण, तसें केल्यानें सगळ्या प्रांतांत परिभ्रमण आपोआप होत असे. भिक्षा हें केवळ निमित्त असे. लोकांची स्थिति स्वतां पाहाणें व लोकांना आपल्या बेताला अनुकूळ करून घेणें, हा मुख्य हेतु त्यांत होता.

मठपतींनीं स्वतां संसार करूं नये. फक्त पोटापुरती भिक्षा मागावी. धान्याचा किंवा कसलाही सांठा करूं नये. जें कोणी कांहीं देईल, त्यांत संतुष्ट असावें. कोणीं पुष्कळ भिक्षा आणली, तर घेऊं नये, एक मूठच घ्यावी. असें समर्थांचें सांगणें होतें. त्यांचें वचन पहा:—

**कांहीं भिक्षा आहे म्हणावें । अल्पसंतोषी असावें ।**
**बहुत आणितां घ्यावें । मुष्टी एक ॥ १ ॥**

मठपतींच्या मनांत स्वार्थाचा लोभ उत्पन्न होऊं नये, म्हणून समर्थांचा केवढा बंदोबस्त पहा ! मनुष्याच्या मनांत स्वार्थ किंवा लोभ आला, म्हणजे दुसऱ्याच्या कल्याणाकडे तो ढुंकूनही बघणार नाहीं, म्हणून लोकांचें कल्याण करण्याला जो लागला, तो मनानें तरी बैरागी असला पाहिजे. त्याच्या ठिकाणीं लोभ अगदीं असतां कामा नये.

---

परिभ्रमण करितां करितां जें काय आपण पाहिलें, त्याची एकान्तीं बसून चाळणा करावी, म्हणजे विचार करावा, अशी समर्थांची पुढची आज्ञा आहे. कोण लोक कसे आढळले, याचा विचार करून ठेवला पाहिजे. आपल्या बेताला उपयोगी पडणारे

कोण, विरुद्ध जाणारे कोण, याची निवड झाली पाहिजे. ती पूर्ण विचार केल्यावांचून व्हावयाची नाहीं. व एकान्तावांचून पूर्ण विचार व्हावयाचा नाहीं. म्हणून मठपतींनीं एकान्तांत जाऊन विचार करावा, असें त्यांनीं सांगितलें. विचारानें जसा कोणत्याही गोष्टीचा उलगडा होतो, तसा दुसऱ्या कशानें होत नाहीं. एकान्तांत विचार केल्यानें आपलें काम साधण्याला किंवा आलेल्या अडचणींतून पार पडण्याला कोणत्या युक्त्या योजाव्या, याचेंही ज्ञान मनुष्याला होतें. म्हणून ज्याला कोणतेंही कार्य करावयाचें असेल, त्यानें कांहीं काळ तरी एकान्तांत चाळणा करण्याचा अभ्यास ठेवावा.

---

**कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेंविण राज्य नाहीं ।**
**केल्याविण होत नाहीं । साध्य जनीं ॥ १ ॥**

समर्थांची पुढली शिकवण ही आहे. उद्योगावांचून जगांत कांहीं होत नाहीं. परमेश्वराची कृपा व माणसाचा प्रयत्न, या जोडीनें यश मिळतें, सर्व कांहीं मिळतें. प्रयत्न न करितां नुसत्या नशिबावर हवाला ठेवून स्वस्थ बसणाराला जगांत कांहीं लाभ होत नाहीं.

**व्याप आटोप करिती । धके चपेटे सोसिती ।**
**तेणें प्राणी सदैव होती । देखत देखतां ॥ १ ॥**

हजारों लोक आपल्या डोळ्यांदेखत वैभवास चढलेले आपण पहातों. पण त्यांना कसें वैभव प्राप्त झालें, याचा विचार आपण करतों का? त्यांनीं उद्योग केला, कष्ट केले, दुःखें भोगलीं, तेव्हां

त्यांना वैभव मिळालें, हें आपण विसरतों. नुसता कपाळाला हात लावून बसल्यानें काय मिळणार ? ज्याचा त्यानें उद्योग केला पाहिजे. परमेश्वर मला देईल, किंवा अमका माणूस मला देईल, ही आशा धरून जो बसेल, तो फसेल, असें समर्थांचें अगदीं ठांसून सांगणें आहे. ते म्हणतात,

**जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।**
**जो आपणाचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १ ॥**

---

**'मृत्यूस न ये चुकवितां । कांहीं केल्या ।'** असें सांगून समर्थ म्हणतात, कोणीही मृत्यूची भीति मुळींच न बाळगतां आपलें कर्तव्य करावें. त्यांतले त्यांत लोकांचें कल्याण करण्याचें काम ज्यानें आंगावर घेतलें, त्यानें मृत्यूची फिकीर कधींच करूं नये. हा मृत्युलोक आहे. येथें जो प्राणी जन्मास आला, त्याला केव्हां तरी, आज नाहीं उद्यां, मरण हें येणारच. मरण हें कोणालाच टाळतां येत नाहीं. व जी गोष्ट टाळतां येत नाहीं, तिची फिकीर करून कर्तव्याला चुकणें हें मनुष्याला शोभत नाहीं. कर्तव्य करतांना मरण येणें हें मोठें पुण्याईचें आहे; म्हणून देशाचे भक्तीला जो लागला, लोकांना शिक्षण देण्याचें काम ज्यानें एकदां हातीं घेतलें, त्यानें जिवावर उदारच झालें पाहिजे. मरणाची भीति वाटली कीं, कर्तव्य थांबलें. म्हणून मनुष्यानें ती भीति सोडून आपल्या कर्तव्याला जागावें.

---

मरण कोणाला चुकत नाहीं, तर मनुष्यानें कीर्ति करून तरी मरावें. या जगांत अखंड कीर्ति करून आपण मरूं, अशी इच्छा माणसानें ठेवावी, असें समर्थ पुढें सांगतात. ज्यानें या जगांत आपलें नांव केलें, तो मेला, तरी त्याचें नांव मागें राहातें. म्हणून '**जनीं मरोनि उरावें । कीर्तिरूपें**' असें समर्थांचें सांगणें आहे. पण ही कीर्ति फुकाची मिळत नाहीं. समर्थ पुढें म्हणतात,

**'झिजल्यावांचुनी कीर्ति कैंची । मान्यता नव्हे कीं फुकाची ।'**

टांकीचे घाव सोसल्यावांचून देवपण येत नाहीं. पण ते सोसल्यावर दगडालाही देवपण येतें. मग कष्ट केल्यावर व हाल सोसल्यावर मनुष्याला मोठेपण येईल, त्याची कीर्ति होईल, यांत काय संशय आहे? सुखावर पाणी सोडून दुःख भोगण्याला तयार व्हावें, तेव्हां कीर्ति मिळते. सुख व कीर्ति हीं दोन्ही कधींही मिळावयाचीं नाहींत. दोहोंपैकीं एक कांहीं तरी मिळेल. सुख पाहिजे असल्यास कीर्ति होणार नाहीं, व कीर्ति पाहिजे असल्यास सुख मिळणार नाहीं. समर्थ म्हणतात,

**' कीर्ति पहातां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाहीं । '**

म्हणून सुखाकडे पाहूं नये, कीर्तीकडे पहावें. मरायचेंच तर मनुष्यानें फुकट मरूं नये, जगांत कांहीं तरी करून मरावें. संसारांत माणसें दंग होतात, व कीर्तीकडे दुर्लक्ष करतात; पण जन्मभर संसार करून मनुष्य जें मिळवितो, त्यांतले बरोबर काय येतें? सगळें जागचें जागीं राहतें.

**येथींच येथें अवघेंचि राहातें । ऐसें प्रत्ययास येतें ।**
**कोण काय घेऊन जातें । सांगाना कां ॥ १ ॥**

म्हणून समर्थ म्हणतात, आपलें कर्तव्य करा व कीर्ति मिळवून मरा. नुसता संसार करून मरून जाऊं नका.

---

जो मठपति झाला, जो देशाच्या सेवेला लागला, त्याच्या ठिकाणीं वैराग्य असावें, असें समर्थ पुढें सांगतात. वैराग्य म्हणजे संसाराबद्दल अप्रीति, तिटकारा, वीट. स्वतांच्या सुखावर पाणी सोडल्यावांचून दहांच्या सुखाचा, देशाच्या सुखाचा उद्योग कोणाही माणसाच्या हातून होणार नाहीं. आपल्या सुखाकडे जो पाहूं लागला, त्याची नजर दुसऱ्याच्या सुखाकडे कधीं जावयाचीच नाहीं. देशाची सेवा करण्याला रात्रंदिवस कष्ट सोसावे लागतात. चंदनाप्रमाणें देह झिजवावा लागतो. ज्याचें देहाच्या सुखाकडे लक्ष असतें, तो आपला देह दुःखांत घालण्याला कसा तयार होणार ? संसारतलीं सुखें तुच्छ आहेत, त्यांपेक्षां देशाची किंवा देवाची सेवा केल्यानें जें सुख मिळतें, तेंच खरें मधुर असतें,अशी ज्याची खातरी झाली,तोच देवाच्या किंवा देशाच्या सेवेला लागतो. म्हणून वैराग्य पाहिजे. स्वतांच्या सुखाबद्दल बेफिकिरी पाहिजे. तरच देशहित माणसाचे हातून होणार.

---

मठपति निःस्पृह असावा. ज्याला स्वतांच्या हिताची मुळींच इच्छा नसते, त्याला निःस्पृह म्हणतात. ज्यानें देशाच्या सेवेचें व्रत घेतलें, त्यानें आपलें व आपल्या कुटुंबाचें हित सोडून दिलें पाहिजे. देवाची व देशाची सेवा करणें हेंच आपलें हित, असा त्याचा निर्धार पाहिजे. ज्यानें स्वार्थ सोडला तोच परार्थ, म्हणजे दुसऱ्याचें हित करील. म्हणून देशभक्तानें स्वार्थ अगदीं

सोडला पाहिजे. यालाच आपण हल्लींच्या बोलण्यांत स्वार्थत्याग म्हणतों. ज्याच्या ठिकाणीं स्वार्थत्याग किंवा निःस्पृहता नसते, त्याच्या बोलण्याकडे लोक लक्ष देत नाहींत. **'स्वतां निःस्पृह असेना । त्याचें बोलणेंचि मानेना ।'** कारण त्याच्या बोलण्यांत कांहीं तरी मतलब किंवा स्वार्थ असेल, असा संशय लोकांना येतो. तसा संशय जराही दिसल्यास लोक त्याच्या थाऱ्यासही उभे राहणार नाहींत. म्हणून मठपतीचें किंवा देशाची सेवा करणाराचें वर्तन असें असलें पाहिजे कीं, त्यांत स्वार्थाचा गंधही नसावा. जो निःस्पृह असतो, त्याच्या शब्दावर सगळ्या लोकांचा तेव्हांच विश्वास बसतो. व त्याच्या सांगण्याप्रमाणें लोक वागण्यास नेहमीं तयार होतात.

---

**' जगामध्यें जगमित्र । जिव्हेपासीं आहे सूत्र ॥ '**

सगळ्या लोकांना वश करून घेण्याची किल्ली जिभेजवळ आहे. सगळ्यांशीं जो गोड बोलतो, दुसऱ्याच्या मनाला दुःख होईल, असा शब्द जो कधींच तोंडांतून काढीत नाहीं, त्याची मैत्री सगळ्या जगाशीं होते. त्याला कोणी शत्रुच राहत नाहीं. म्हणून देशभक्ताचें किंवा मठपतीचें बोलणें नेहमीं मधुर असावें, असें समर्थांचें म्हणणें आहे. देशाचें कल्याण होण्याला, देशाचें हित साधण्याला सगळ्या लोकांचीं मनें एक झालीं पाहिजेत. एरवीं देशाचें हित साधावयाचें नाहीं. व पुढाऱ्याच्या ठिकाणीं गोड बोलण्याचा गुण नसेल, तर सर्व लोकांचीं मनें त्याला आपलींशीं करितां येणार नाहींत. म्हणून मठपतीनें किंवा पुढाऱ्यानें आपल्या वाणीनें कोणाचेंही मन दुखवितां कामा नये. त्याच्या बो-

लण्यांत कठोरपणा मुळींच नसावा. तें असें असावें कीं, तें ऐक-ल्याबरोबर सर्वांचीं मनें अगदीं गार होऊन जावीं. लहानथोर, शहाणावेडा, गरीबश्रीमंत, कोणीही असो. त्याच्याशीं पुढाऱ्याचें बोलणें अगदीं प्रेमळपणाचें असावें. '**उंचनीच म्हणों नये । सकळांचें निववावें हृदय ।**' किंवा '**प्राणिमात्रास मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ।**' हीं समर्थांचीं वचनें हेंच सांगतात.

---

मठपतीनें किंवा पुढाऱ्यानें '**कदापि रागास न यावें ।**' लोकांच्या हातून चुका झाल्या, किंवा लोक कांहीं बोलले, तरी मठपतीनें किंवा पुढाऱ्यानें राग धरूं नये. रागानें लोकांचीं मनें दुखावतात, व तीं दुखावलीं म्हणजे ते जवळ येत नाहींत. म्हणून पुढाऱ्याचे आंगीं क्षमा असावी, लोकांचे अपराध पोटांत घालण्याचा गुण असावा. त्याच्या मनाची शांति कशानेंही ढळतां कामा नये. कोणी कितीही टाकून बोलला, तरी त्यानें शांत रहावें. समर्थ म्हणतात,

'**उदंड धिक्कारून बोलती । तरी चळों नेदावी शांती ।**'
ज्याला मानापमानाची चाड असते, त्याला कोणीं मान दिला नाहीं, किंवा कोणीं अपमान केला, तर राग येतो. पण पुढाऱ्याचे किंवा मठपतीचे ठिकाणीं मानाची इच्छाच असूं नये.

'**कांहीं मान इच्छूं नये कोठें तरी ।**'

आपण मानाची इच्छा कोणापासून करूंच नये, असें समर्थांचें सांगणें आहे. मानाची जर इच्छाच नसेल, तर तो न मिळाल्याबद्दल राग कसा येणार ? पुढाऱ्याचा लोकांनीं धिक्कार करूनही जर त्याला राग आला नाहीं, तर उलटे लोकच खजील होतात.

आपल्या वर्तनाबद्दल त्यांना पश्चात्ताप होतो व ते शेवटीं त्याच्यावर भक्ति करूं लागतात. समर्थ म्हणतात, पुढाऱ्यानें—

**धके चपेटे सोसावें । नीच शब्द साहात जावे ।**
**पस्तावोन परावे । आपले होती ॥ १ ॥**

तात्पर्य, पुढाऱ्याचे ठिकाणीं सहनशीलता पाहिजे. ती नसेल, तर लोक त्याच्या बाजूला येणार नाहींत.

'**जो बहुतांचें सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना ।**' म्हणून त्यानें '**बरें वाईट सोसावें । समुदायाचें ।**'

---

**शरीर परोपकारीं लागावें । बहुतांच्या कार्यास यावें ।**
**उणें पडों नेदावें । कोणि एकाचें ॥ १ ॥**

दुसऱ्यावर उपकार करण्यांत देह झिजविणें हें पुढाऱ्याचें किंवा मठपतीचें खरें कर्तव्य आहे. दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याचा जो जो प्रसंग येईल, तो तो पुढाऱ्यानें फुकट दवडूं नये. परोपकार अमक्यावर करावयाचा, व अमक्यावर करावयाचा नाहीं, असें नसावें. दुष्टावर किंवा शत्रूवरही उपकार करावा. असे केल्यानें दुष्ट किंवा शत्रु असतात, तेही मित्र होतात, [illegible]च्या कार्याला येऊन मिळतात. शत्रूंना किंवा दुष्टांना आ[illegible] बाजूला ओढण्याला त्यांच्यावर प्रसंगीं उपकार करणें हाच उत्तम उपाय आहे. समर्थ म्हणतात:—

**आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहानथोर ।**
**तैसाचि करीं उपकार । मनापासुनी ॥ १ ॥**

---

पुढाऱ्याच्या किंवा मठपतीच्या ठिकाणीं आतांपर्यंत सांगित-

लेले सगळे गुण असावे. पण त्यांतले त्यांत कोणत्या तरी एका गुणाचा त्याच्या अंगीं अगदीं कडेलोट झालेला असावा. असा कडेलोट झालेला असला, म्हणजे समर्थ म्हणतात, लोक ' **तया महापुरुषाकारणें । धुंडीत येती ।** ' असा पराकाष्ठेचा एखादा गुण अंगीं असला, म्हणजे लोक त्याला आपोआप शोधीत येतात. एका गुणाचा कडेलोट झाला असतां जर लोक इतके येतात, तर सगळेच गुण एखाद्याच्या ठिकाणीं पूर्णपणें असले, तर तो केवढा चमत्कार करील बरें ! सगळें राष्ट्र तो हालवून सोडील, यांत कांहीं शंका नाहीं.

आतांपर्यंत जे गुण सांगितले, ते सगळे गुण, निदान त्यांपैकीं बरेच गुण ज्याच्या अंगीं असतील, त्याच्याच हातून कांहीं तरी धर्माची किंवा देशाची खरी कामागिरी होते. असा कांहीं गुण नसतांना देशाचें काम करण्याला जो तयार होईल, त्याच्या हातून कांहीं व्हावयाचें नाहीं. त्याला श्रममात्र फुकट होतील. म्हणून धर्माच्या किंवा देशाच्या कामाला हात घालण्यापूर्वीं हे गुण अंगीं आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

असे गुणवंत पुढारी आपल्या देशांत निपजोत, व त्यांच्या हातून या आपल्या सुंदर देशाचा लौकर उद्धार होवो, अशी श्रीरामाच्या पायांशीं शेवटीं अगदीं कळकळीची प्रार्थना आहे.

**' श्रीराम जय राम जय जय राम ! '**

**समाप्त.**

*

# शुद्धिपत्र.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १२ | १ | मतांत | मनांत |
| १८ | १७ | माठा | मोठा |
| २० | १४ | त्यांचा | त्यांच्या |
| २६ | १७ | बरें ? | बरें ! |
| ३६ | २४ | तुझा | तुझी |
| ३७ | ५ | करावे | करावें |
| ३८ | १२ | म्लेंच्छा- | म्लेंच्छां- |
| ४३ | १ | वाहवाट | वहिवाट |
| ४६ | २१ | चालू | चालू |
| ५२ | २ | रगूंन | रंगून |
| ५२ | २ | गलले | गेलेले |
| ५२ | १० | ला- | लो- |
| ५६ | २३ | का- | काय |
| ५६ | २४ | किंय | किं- |
| ६२ | ७ | आका- | आका |
| ६५ | ६ | महारा | महाराष्ट्र- |
|  |  | राज्य | राज्य |
| ८० | ९ | उठविलली | उठविलेली |

# श्रीकृष्णचरित्र

हा ग्रंथ रामचरित्राचे नमुन्यावर लिहिलेला असून 'श्रीरामचरित्रा' स जसा वाल्मीकीरामायणाचा आधार घेतला तसा या ग्रंथास 'श्रीभारत, श्रीभागवत व हरिवंश या तीन ग्रंथांचा आधार घेतला आहे. श्रीकृष्णाचें चरित्र रामचरित्राप्रमाणें एका संदर्भानें एक्या ग्रंथांत वर्णिलें नसल्यामुळें तो संदर्भ जुळवून कथानकांचें एकजीवीकरण व त्यांचे संविभाग दाखविणें हें कठिण काम या ग्रंथांत ग्रंथकर्त्यास करावें लागलें असून तें त्यांनीं फारच सरस वठविलें आहे यांत शंका नाहीं. भगवद्गीता या पर्वांत भगद्गीतेचें बहुतेक समग्र भाषांतर केलें असून तें फारच सुंदर वठलें आहे. गीतेचा व्यासंग करणारांसही हें रूपांतर मूळ श्लोकांबरोबर ताडून पाहण्याबद्दलची आमची शिफारस आहे. श्रीरामचरित्राप्रमाणें या ग्रंथास उपोद्घात व उपसंहार जोडले आहेत. उपोषाद्‌तांत श्रीकृष्णचरित्राची महती वार्णिली असून उपसंहारांत त्या काळची थोडी माहिती व श्रीभगवच्चरित्राचे रहस्य गाइलें आहे. कित्येकांचे मतें श्रीकृष्णाचें चरित्र श्रीरामचंद्राप्रमाणें उदात्त नाहीं. पण ही कल्पना निव्वळ भ्रामक असून श्रीकृष्णचरित्र भिन्नपरिस्थितींत श्रीरामचरित्राप्रमाणेंच उदात्त व निष्कलंक आहे, एवढेंच नव्हे तर अत्यंत उपदेशपर आहे. अशी वरील चरित्राच्या वाचनानें त्यांची खात्री पटल्यावांचून राहणार नाहीं. पुस्तकांत जागजागीं विषयानुरोधानें १० सुंदर चित्रें घातलीं असून बाइंडिंग जाड पुठ्ठयाचें मजबूत आहे. किं० १ रुपया ट. ह. निराळें.

# शिवकथामृत,—

ह्या ग्रंथांत शिवलीलामृतांतील १७ गोष्टींचे सारांश शुद्ध मराठींत वर्णन केले असल्यामुळें साधारण लोकसमाजास व बायकामुलांस तें वाचण्यास व समजण्यास मुळींच अडचण पडत नाहीं. शिवाय ह्यांत निरनिराळ्या प्रसंगांचीं २० रंगीत मनोहर चित्रें जागजागीं घातलीं आहेत. पुस्तकास जाड कागद वापरला असून बांधणी मजबूत आहे किं. ८६.

मिळण्याचें ठिकाणः—चित्रशाळा प्रेस पुणें सिटी